रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २४४
www.ramprahar.com

शनिवार, २२ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

राजिप घोटाळ्यातील आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले/२
म्हसळ्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार; आरोपी अटकेत/५
अलिबागच्या शुभम नखातेला मार्शल आर्टमध्ये 'सुवर्ण'/८

## मध्य रेल्वेकडून ३५६ उन्हाळी गाड्यांची घोषणा

**मुंबई :** मध्य रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी नियमित गाड्यांच्या व्यतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवत आहे. रेल्वे प्रशासनाने आधीच ३३२ उन्हाळी विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई आणि हुजूर साहेब नांदेडदरम्यान उन्हाळी विशेष गाड्यांच्या २४ अतिरिक्त सेवा चालवणार आहे. यामुळे उन्हाळी विशेष गाड्यांची एकूण संख्या ३५६वर गेली आहे. विशेष ट्रेन क्रमांक ०११०५चे बुकिंग विशेष शुल्कासह २५ मार्च रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल. अनारक्षित कोचसाठी तिकिटे अतिजलद मेल/एक्सप्रेस ट्रेनसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कासह यूटीएसद्वारे बुक करता येतील. तपशीलवार वेळा व थांब्यांसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा.

# आगामी निवडणुका महायुती एकत्र लढवणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीतील तिन्ही पक्ष एकत्र लढतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. महापालिकेच्या निवडणुकीत महायुती एकत्र लढेल. आम्ही तिघे एकत्र राहू. एखाद्या महापालिकेत कदाचित नाही होऊ शकणार, पण जिथे जिथे शक्य होईल त्या त्या ठिकाणी एकत्र लढण्याचा आमचा निर्णय असेल. मुंबईत आम्ही एकत्रच लढणार हे निश्चित आहे, असे मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. गेले अडीच वर्षे आमचे सरकार वॉर झोनमध्ये काम करत होते. लोकसभा, विधानसभा निवडणूक असा मोठा वॉर झोन होता. त्या वेळेस आपले गोल शॉर्ट असतात. त्यानंतर आता लॉन्ग टर्मचे गोल ठेवावे लागतात. प्रत्येक विभागाला १०० दिवसांचे टार्गेट दिलंय. आम्ही १५ एप्रिलपर्यंत वेळ दिला आहे. त्यांना त्यांचा तो प्लॅन पूर्ण करायचा आहे. तहसील स्तरावर १० हजार ऑफिसेसला सात कलमी कार्यक्रम दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

शक्तीपीठ, रिंगरोड, नदी जोड प्रकल्प, विमानतळे अशा प्रकल्पांचे फायनाशिअल प्लॅनिंग केलेय. पुणे विमानतळाचे नोटीफीकेशन काढले. शेतीच्या क्षेत्रात एआयचा उपयोग जास्तीत जास्त करायचा आहे. त्यासाठी महाटेक अशी व्यवस्था आपण उभी करत आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



### दिशा सालियन प्रकरणावर कोर्टाच्या भूमिकेकडे लक्ष

दिशा सालियन प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, या प्रकरणाची चर्चा कोर्टातील केसमुळे सुरू झाली आहे. तिच्या वडिलांनीपण मुलाखत दिली आहे. कोर्ट काय म्हणतंय, कोर्टात ते काय पुरावे देतात याच्या आधारावर शासनाची भूमिका ठरेल. कोर्ट ज्या प्रकारे आम्हाला आदेश देईल किंवा तेव्हा काही नवीन गोष्टी आल्या तर त्यानुसार सरकार निर्णय घेईल.

नागपूर हिंसाचार प्रकरणावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मूठभर लोकं अशा प्रकारच्या गोष्टी करतात आणि शहराचे नाव खराब होते. सामाजिक सलोखाही बिघडला. १९९२नंतर पहिल्यांचा नागपुरात अशा प्रकारचा तणाव दिसला. ज्यांनी वातावरण बिघडवले त्यांना आम्ही सोडणार नाही. पोलिसांवर हल्ला करणे खपवून घेतले जाणार नाही. दोषींना अद्दल घडवू, असा इशाराही त्यांनी दिला.

मी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आम्ही ट्रान्फरन्सीवर फोकस केला आहे. ओएसडीसंदर्भात मी मंत्र्यांना सांगितले तुमचा ओएसडी मी ठरवणार नाही, मात्र तुम्ही नाव पाठवाल त्याला अप्रुव्हल देण्याचा अधिकार माझा आहे. त्या नावात जर मला वाटले या लोकांचा फिस्कर अशी इमेज आहे, पास्ट रेकॉर्ड चांगला नाही अशांना अप्रुव्ह केलेले नाही.

ज्या प्रकारे आम्ही २०१९मध्ये मी बाहेर गेलो, तेव्हा मनात एक दुःख होते. एकनाथ शिंदेंप्रमाणे आम्हाला हलक्यात घेऊ नका हे दाखवायचे होते. या पाच वर्षात वाईटपणा घ्यावा लागला तरी महाराष्ट्राची घडी योग्य बसवायचीय. लोकं तुम्ही कामे काय केली ते लक्ष ठेवतात, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# खारघर येथे झालेल्या शिवकुमार शर्मा यांच्या मृत्यूस जबाबदार आयोजक संस्थेवर कारवाई करा

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांची अधिवेशनात आक्रमक मागणी

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील इज्तिमाच्या कार्यक्रमाला आलेल्या रेहान शेख व फैजान शेखने शिवकुमार शर्मा या युवकाला जीवघेणी मारहाण केली आणि या हल्ल्यात शिवकुमार यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन जीव गमवायला लागला. या क्रूर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता याला जबाबदार असलेल्या संस्थेवर कारवाई करण्याची आणि भविष्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आक्रमकपणे विधीमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे केली.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, खारघर येथील सिडकोच्या कॉर्पोरेट पार्क मोकळ्या भूखंडावर ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी अंजुमन मदरसा अरेबिया इस्लामिया कासिमुल हक्कानी मस्जिद या संस्थेच्या माध्यमातून इज्तिमाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, सिडकोने परवानगी देताना ध्वनी प्रदूषण, कायदा सुव्यवस्था, रहदारी व अन्य संबंधी घालून दिलेल्या अटी शर्तींचे पालन आयोजकांकडून झाले नाही. इज्तिमाच्या दिवशी सायंकाळी मोहम्मद रेहान शेख व अन्य एका इसमाने आयटी व्यावसायिक शिवकुमार शर्मा या युवकाला जबर मारहाण केली आणि या मारहाणीत युवकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्या अनुषंगाने शिवकुमार शर्मा तक्रार दाखल करण्यासाठी खारघर पोलीस ठाण्यात गेले होते. जखमी अवस्थेत पोलीस ठाण्यात असताना डोक्यात मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने अत्यस्वस्थ अवस्थेत शर्मा यांचा मृत्यू झाला.

इज्तिमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने परवानगी घेताना वाहतूक, पार्किंग, स्वच्छता, सुरक्षा अशा विभागात प्रत्येकी ३०० असे एकूण १२०० व्हॉलिंटिअर सज्ज करणार असल्याचे सांगितले गेले होते तसेच इज्तिमाला ५० हजार लोकं उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले, मात्र प्रत्यक्षात दोन लाखांपेक्षा जास्त लोकं या ठिकाणी उपस्थित राहिले. खारघर शहरातील उत्सव चौकाजवळ रस्ता क्रॉस करताना मारहाणीची घटना



घडली, ज्या ठिकाणी वाहतूक पोलीस तसेच आयोजकांचे व्हॉलिंटिअर हजर नव्हते. वाद होतोय, मारामारी होतेय आणि हेल्मेटच्या प्रहाराने जीव जाण्यापर्यंत मारहाण केली जाते; मग मदत करायला कुणीही आले नाही. जर त्या ठिकाणी आयोजकांचे व्हॉलेंटिअर होते, तर त्यांनी यामध्ये मदत करायला हवी होती, मात्र तसे झाले नाही आणि यामध्ये शिवकुमार शर्मा यांचा नाहक जीव गेला, असे सभागृहाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगतानाच या इज्तिमाला ४ डिसेंबर २०२४ ते ३० जानेवारी २०२५पर्यंत अशी तब्बल ५८ दिवसांची परवानगी सिडकोने दिल्याचा प्रकारही त्यांनी उघडकीस आणला.

जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होणार होता, तर तशी खबरदारी घेणे आयोजक संस्थेची जबाबदारी होती. म्हणूनच अप्रत्यक्षरित्या का होईना ही संस्था या मृत्यूला जबाबदार आहे. त्यामुळे या संस्थेविरोधात गुन्हा दाखल करावा आणि अशा संस्थेला भविष्यकाळात कार्यक्रम करण्याची परवानगी देऊ नये. तरच लोकांच्या जीविताचे संरक्षण होईल. त्यामुळे अशी काळजी शासनाने घेण्याचीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. त्याचबरोबर जेथे हा कार्यक्रम झाला त्या खारघर येथे आता मोठ्या प्रमाणात अनधिकृत मशिदी उभ्या राहत आहेत. हॉटेल बेसमेंटमध्ये नमाज पठणासाठी वेगवेगळ्या सुविधा मिळणार अशा ऑफर केल्या जातात. त्या आशयाचे स्टिकर रेल्वेमध्ये लावले जात आहेत आणि त्या अनुषंगाने खारघर तळोजा परिसराचा मुंब्रा करण्याचा घाट घातला जात आहे. (पान २ वर..)

# 'मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करा'

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करीत प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याची मागणी केली. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे उत्तर राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

रायगडातील बहुतांश महाविद्यालयांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती न मिळाल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांमार्फत मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज रायगड जिल्हा समाजकल्याण विभागाकडे पोहचले नसल्याने संबंधित विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे याची चौकशी करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधले.

या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरातून मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्ती न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण झाली असल्याची तसेच काही महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज जिल्हा समाजकल्याण विभागाकडे पोहच न झाल्याने हे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याची बाब अंशतः खरी आहे. (पान २ वर..)

## निवडक

### एक वर्षात ३८० नक्षली ठार, १०४५ जणांचे आत्मसमर्पण

**नवी दिल्ली :** राज्यसभेत शुक्रवारी (दि.२१) गृह मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा झाली. या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद्यांना संपवण्याच्या आपल्या वचनाचा पुनरुच्चार केला. एका वर्षात २६१९ नक्षलवादी कमी झाले आहेत. वर्षभरात ३८० नक्षलवाद्यांना मारले गेले, तर १०४५ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. आता फक्त १२ जिल्हे नक्षलग्रस्त आहेत, असेही गृहमंत्र्यांनी सांगितले.

### महायुतीच्या बिनविरोध विधान परिषद सदस्यांचा शपथविधी

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेवर बिनविरोध निवडून गेलेल्या महायुतीच्या पाचही सदस्यांनी शुक्रवारी (दि.२१) सभागृहाचे सदस्य म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित सदस्यांची सभागृहाला ओळख करून दिली. शपथविधी झालेल्यांमध्ये भाजपचे दादाराव केचे, संजय केणेकर, संदीप जोशी, राष्ट्रवादीचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांचा समावेश आहे. विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध झाली होती.

# देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी मुंबईत धावणार



### स्विडनची कँडेला कंपनी पायलट प्रोजेक्ट राबविणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांची ई-वॉटर टॅक्सीबाबतची प्रतीक्षा संपणार असून स्वीडनची कँडेला कंपनी पर्यावरणपूरक वॉटर टॅक्सीचा पायलट प्रोजेक्ट राबवून ही सेवा सुरू करणार आहे. या संदर्भात राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे यांनी शुक्रवारी (दि. २१) स्वीडनचे महावाणिज्यदूत स्वेन ओस्टबर्ग यांच्यासोबतच्या बैठकीत चर्चा केली.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला मंत्री राणे आणि स्वीडनचे महावाणिज्यदूत ओस्टबर्ग यांच्यासह त्यांच्या सल्लागार सलोनी झव्हेरी व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री राणे यांनी सांगितले की, मुंबई महानगरामध्ये वाहतूक यंत्रणेवर ताण येत असून ई-वॉटर टॅक्सी लवकर सुरू होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही आहेत. गेटवे ऑफ इंडिया ते एलिफंटा आणि गेट वे ऑफ इंडिया ते अलिबाग या जलवाहतूक मार्गाच्या पायलट प्रोजेक्टने मुंबईला भेडसावणारा वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे. कँडेला कंपनीशी झालेल्या करारानुसार त्यांनी नागरिकांची सुरक्षितता, वातावरण, पर्यावरण यांचा विचार करावा. शिवाय वॉटर टॅक्सीचे नागरिकांना परवडणारे माफक दर ठेवावेत. कंपनीला लागणाऱ्या परवान्याबाबत राज्य शासन दक्षता घेईल.

महावाणिज्यदूत ओस्टबर्ग यांनी महाराष्ट्रातील पोर्टच्या विकासात स्वारस्य दाखवित म्हणाले की, स्वीडनची कँडेला कंपनी येऊन सर्व माहितीचे सादरीकरण करेल. त्यानंतर वॉटर टॅक्सीचा पायलट प्रोजेक्ट त्वरित सुरू करू. त्यामुळे आगामी काळात देशातील पहिली ई-वॉटर टॅक्सी मुंबईत धावताना पहावयास मिळेल.


## आग्र्यात शिवरायांच्या भव्य स्मारकासाठी शासन आदेश जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथे भव्य स्मारक उभारण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती तसेच उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवारांनी जो अर्थसंकल्प सादर केला त्यातही या स्मारकासाठी तरतूद करण्यात आली. आता या स्मारक उभारण्यासंबंधीचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

शिवरायांच्या स्मारकासाठी पर्यटनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे.

# कर्जतमध्ये दोन विद्यार्थी बेपत्ता




**कर्जत : प्रतिनिधी**

शाळेत गेलेले दोन विद्यार्थी बेपत्ता झाल्याची घटना कर्जतमध्ये घडली आहे. अपहरण करण्यात आलेला एक विद्यार्थी दहिवली येथील बालसुधारगृहात, तर दुसरा विद्यार्थी शिरसे गावात राहणारा आहे. दोघेही दहिवलीतील जि.प. शाळेत शिक्षण घेत होते. त्यांचे अपहरण झाले असल्याबाबतची नोंद कर्जत पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अपहरणाचा गुन्हा दाखल

कर्जत शहराजवळील दहिवली येथील बालसुधारगृहातील विद्यार्थी आणि त्याचा शिरसे येथे राहणारा मित्र (दोघांचे वय १२) असे दोघे १९ मार्च रोजी सकाळी ८.४५च्या सुमारास रायगड जिल्हा परिषदेच्या दहिवली येथील शाळेत शिक्षणासाठी गेले होते. शाळा सुटल्यावर शिरसे येथील मुलाचे पालक त्याला घेण्यासाठी शाळेत आले असता तो व त्याचा मित्र शाळेत नसल्याचे समोर आले.

बेपत्ता विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला, मात्र ते सापडले नाहीत. दोन्ही विद्यार्थी अल्पवयीन असल्याने त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन त्यांना फूस लावून कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले म्हणून याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम १३७(२) अन्वये अर्थात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस शिपाई भागवत करीत आहेत.

# आजपासून क्रिकेटप्रेमींना आयपीएलची पर्वणी

## रंगारंग उद्घाटन सोहळा; केकेआर वि. आरसीबी सलामीची लढत

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या हंगामाला शनिवार (दि.२२)पासून सुरुवात होत आहे. सलामीची लढत गत चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे. हा सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्सच्या मैदानात खेळण्यात येणार आहे.

सलामीच्या लढतीआधी होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यात बॉलीवूड अभिनेत्री दिशा पाटनी आणि लोकप्रिय गायिका श्रेया घोष रंग भरणार असल्याची माहिती समोर आली आहे. या वेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह उपस्थित राहणार आहेत.

क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचे अध्यक्ष स्नेहाशिष गांगुली यांनी दिलेल्या माहितीनुसार आयपीएलच्या उद्घाटन




समारंभासाठी सामना सुरू होण्याच्या आधीच्या २५ मिनिटांचा वेळ निश्चित करण्यात आला आहे. तेवढ्या वेळात प्रेक्षकांना हा छोटासा, पण मनोरंजक कार्यक्रम पहायला मिळेल याची आम्ही खात्री देतो.

या हंगामात, चेन्नई सुपर किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स, गुजरात टायटन्स, कोलकाता नाईट रायडर्स, लखनऊ सुपर जायंट्स, मुंबई इंडियन्स, पंजाब किंग्ज, राजस्थान रॉयल्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या १० संघांमध्ये एकूण ७४ सामने १३ ठिकाणी खेळवले जातील, तर आयपीएलची अंतिम लढत २५ मे रोजी पार पडणार आहे.

### पावसाचे सावट

आयपीएल स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याची जोरदार चर्चा रंगत असताना सामन्यावर संकटाचे ढग दाटून आले आहेत. हवामान विभागाने दक्षिण बंगाल परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. आयपीएल सलामीच्या लढतीच्या दिवशी ऑरेंज अलर्ट, तर रविवारी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पाऊस पडल्यास सामना खेळवणे कठिण होईल.

# सीकेटी कॉलेजच्या सांस्कृतिक विभागाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली आहे. संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.



असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या समूहामधून सीकेटी महाविद्यालयाचा विद्यार्थी जितेंद्र माने याने सहभाग घेत स्किट या लघु नाटिका प्रकारात राज्यस्तरावर रौप्यपदक, वेस्ट झोन स्तरावर सुवर्णपदक, तर राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक प्राप्त केले. सोबत जीत जाधव याने मूक अभिनय या प्रकारात राज्यस्तरावर कांस्यपदक, तर वेस्ट झोन स्तरावर उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

७७वा आंतरराष्ट्रीय फोक आर्ट फेस्टिवल ७ ते १७ मार्चदरम्यान इटली देशात आयोजित करण्यात आला होता. या फेस्टिवलसाठी भारतातर्फे मुंबई विद्यापीठाला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. मुंबई विद्यापीठाने त्या महोत्सवात दिवली हा लोकनृत्य प्रकार सादर केला. या नृत्य प्रकारात मुंबई विद्यापीठांमधील सर्व महाविद्यालयांतून आठ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या संघात सीकेटी कॉलेजमधून सुरभी घांगनेकर आणि अक्षिता मिश्रा या दोन विद्यार्थिनींची निवड झाली होती. फेस्टिवलमध्ये ३० देशांनी सहभाग घेतला.

सर्व पारितोषिक विजेते विद्यार्थी व चमू तसेच सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्रा.डॉ. गीतीका तन्वर, सांस्कृतिक समन्वय गणेश जगताप यांचे या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी कौतुक केले. या वेळी संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील, प्राध्यापक उपस्थित होते.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटविणार -महसूलमंत्री बावनकुळे

**मुंबई : प्रतिनिधी**

शासकीय जमिन व देवस्थान इनाम जमिनीवर झालेली अतिक्रमणे महसूल, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने हटवली जातील, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी सांगितले.

सदस्य मोनिका राजळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय जमीन व देवस्थान इनाम जमिनीवर अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण संदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, संबंधित तालुक्याचे तहसीलदार, पोलीस विभाग आणि स्थानिक प्राधिकरण यांची बैठक घेऊन यासंदर्भात कार्यवाही केली जाईल.

ग्रामपंचायत व नगरपालिका हद्दीत असलेल्या अतिक्रमणांसाठी स्थानिक प्रशासनाला जबाबदारी सोपवली जाईल. महसूल विभागाच्या अखत्यारितील अतिक्रमण हटवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांवर असेल. तर गृह विभागाच्या निर्णयानुसार, अनधिकृत धार्मिक स्थळांवरही कायदेशीर कारवाई केली जाईल असेही त्यांनी सांगितले.

**देवस्थान इनाम जमिनीबाबत कायदा करणार**

देवस्थान जमिनी या इनाम वर्ग ३च्या जमिनी असून त्या अहस्तांतरणीय आहेत. या जमिनीच्या प्रश्नासंदर्भात सर्वसमावेशक निर्णय घेण्यासाठी प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अहवालानंतर यासंदर्भात कायदा करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. देवस्थान इनाम जमीनसंदर्भात सदस्य गोपीचंद पडळकर यांनी विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली होती.

उत्तरात अधिक माहिती देताना महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, प्रधान सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीत स्थानिक आणि देवस्थान व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्तींचा समावेश केला जाईल. देवस्थानाच्या जमिनी शेतकऱ्यांना मिळाव्यात ही शासनाचीही भूमिका आहे. जमिनी वर्ग १ करण्याबाबतही शासन सकारात्मक आहे. तसेच केंद्र सरकारच्या वक्फ बोर्ड कायद्याचा परिणाम देखील देवस्थानाच्या जमिनींवर होऊ शकतो, त्यामुळे त्या अनुषंगानेही विचार केला जात असल्याचेही महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

## सिडकोची अभय योजना ३१ मार्चपर्यंत

नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा

महाराष्ट्र शासनाने अभय योजनेअंतर्गत बांधकाम कालावधी वाढविण्यासाठी नवी मुंबई प्रकल्पातील भूखंडधारकांना देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्कावर ५०% सवलत जाहीर केली आहे. याव्यतिरिक्त, भूखंड/सदनिका/दुकानधारकांना नागरी सुविधा पुरवण्यासाठी सिडकोने आकारलेल्या सेवा शुल्काच्या मूळ रकमेवर ५०% सवलत जाहीर केली आहे. ही अभय योजना ३१.०३.२०२५ पर्यंत लागू असून सदर योजनेस यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. नागरिक या www.cidco.maharashtra.gov.in वेबसाईट वर ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

## धनादेशाऐवजी ऑनलाईन वीजबिल भरा

### महावितरणचे आवाहन; धनादेशाचा अनादर झाल्यास दंड

**कल्याण : प्रतिनिधी**

वीजबिलाचा भरणा करण्यासाठी दिलेल्या धनादेशाचा कोणत्याही कारणामुळे अनादर (चेक बाऊंस) झाल्यास ७५० रुपये व त्यावर १३५ रुपये जीएसटी किंवा बँक चार्जेस यापैकी अधिक असणारी रक्कम दंड म्हणून आकारण्यात येते. याशिवाय संबंधित ग्राहकाची धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा सहा महिन्यांसाठी खंडित करण्यात येते. या पार्शवभूमीवर वीज ग्राहकांनी धनादेशाऐवजी ऑनलाईन वीजबिल भरावे व संभाव्य त्रास टाळावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या कल्याण परिमंडलात फेब्रुवारी- २०२५ या एका महिन्यात २ कोटी ८० लाख रुपयांच्या वीजबिलाचे २ हजार ७१४ धनादेश तर मार्चमध्ये आतापर्यंत १ कोटी १२ लाख रुपयांच्या वीजबिलाचे ७५१ धनादेश विविध कारणांमुळे अनादरीत (बाऊंस) झाले आहेत. भांडुप परिमंडलात फेब्रुवारीमध्ये १ कोटी ३१ लाख रुपयांच्या वीजबिलाचे ९४१ धनादेश तर मार्चमध्ये आतापर्यंत ६०० धनादेश विविध कारणांमुळे अनादरीत (बाऊंस) झाले आहेत.

धनादेशावर चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, खात्यात संबंधित रक्कम नसणे आदी कारणांवरून धनादेश अनादरित होत असल्याचे आढळून येत आहे. धनादेश अनादरीत झालेल्या ग्राहकांना जीएसटीसह ८८५ रुपये किंवा बँक चार्जेस यापैकी जी रक्कम जास्त असेल तो दंड म्हणून लावण्यात आली आहे. पुढील वीजबिलात या रकमेचा समावेश करण्यात येईल.

अनेक वीजग्राहक अंतिम मुदतीच्या एक-दोन दिवसांपूर्वी धनादेशाद्वारे वीजबिलाची रक्कम भरतात. धनादेश वटण्यास साधारणतः दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे कार्यालयीन कामकाजाच्या तीन ते चार दिवस अगोदर धनादेश देणे आवश्यक आहे. मुदतीनंतर वीजबिलाचा भरणा झाल्यास संबंधीत ग्राहकांना धनादेशाद्वारे भरलेली रक्कम थकबाकी म्हणून पुढील बिलात लागून येते किंवा कोणत्याही कारणाने धनादेश अनादरीत (बाऊंस) झाला तर आर्थिक दंडासह वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जाते.

# वापरलेल्या कपड्यांच्या व्यवस्थापनाचा नवी मुंबईत देशातील पहिला प्रकल्प

## टाकाऊतून टिकाऊ संकल्पना; जुने कपडे संकलनासाठी सोसायट्यांमध्ये विशेष पेट्या ठेवण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या बदलत्या फॅशन ट्रेंडमुळे कपडे वापरण्याचा कालावधी कमी झाला असून त्यामुळे कपडे टाकून देण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. यावर ठोस उपाय योजना करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या अखत्यारितील वस्त्र समितीच्या वतीने पुढाकार घेण्यात येउन टाकाऊ वस्त्रावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याचा नाविन्यपूर्ण प्रकल्प नवी मुंबईत राबविण्यात येत आहे.

केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालय अंतर्गत टेक्सटाईल कमिटी, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या माध्यमातून हा अभिनव प्रकल्प देशात पहिल्यांदाच नवी मुंबईत राबविण्यात येत असून यामध्ये एसबीआय फाऊंडेशन लि.,आयडीएच इंडिया हब प्रा.लि., टिसर आर्टिसन ट्रस्ट या संस्थांचा सहयोग असणार आहे. या ५ संस्थांमध्ये या बाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

नवी दिल्ली येथील विशेष समारंभात भारताचे पंतप्रधान मोदी यांनीही नवी मुंबईत हा अभिनव प्रकल्प राबविला जात असल्याचा विशेष उल्लेख केला होता. कापड मूल्य साखळीतील शाश्वतता आणि परिपूर्णता लक्षात घेत वापरानंतरच्या वस्त्रांचे सुयोग्य व्यवस्थापन करणारा हा प्रकल्प टाकून दिलेल्या कपड्याचे मूल्यवान उत्पादनामध्ये रुपांतर करणार असून याव्दारे स्थानिक कारागीरांना शाश्वत रोजगार उपलब्ध होणार आहे. यामध्ये विशेषत्वाने महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होणार आहे.




या प्रकल्पांतर्गत टाकाऊ वस्त्रांचे सकलन करण्याकरिता पहिल्या टप्यात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २५० सोसायट्यांमध्ये जुने कपडे संकलन करण्याकरिता पेट्या ठेवण्यात येणार असून महानगरपालिकेच्या पुढाकाराने एस.बी. आय. फाउंडेशन लि. यांच्या मदतीने व टिसर आर्टिसन ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेमार्फत एकुण ४७ सोसायट्यांमध्ये स्वतंत्र ४९ पेट्या ठेवण्यात आल्या आहेत. उर्वरित पेट्या टप्प्याटप्प्याने इतर सोसायट्यांमध्ये ठेवण्यात येणार आहेत.

टाकाऊ वस्त्राचे संकलन करणेकरिता स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात आली असून शहरात विविध ठिकाणी असलेले थ्री आर सेंटर्स व ४७ सोसायट्यांमधून टाकाऊ वस्त्र संकलीत करण्यात येणार आहेत. बेलापूर येथील शकुंतला महाजन बहुउद्देशीय इमारत, से.२, सीबीडी बेलापूर या ठिकाणी संकलित वस्त्रावर पुढील प्रक्रिया करण्याकरिता टाकाऊ वस्त्र प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहे.

टिसर आर्टिसन ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने सदर चांगल्या स्वरुपातील टाकाऊ वस्त्रांचे विलगीकरण करून हॅन्डलूमच्या सहाय्याने अप - सायकलींग करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत टाकाऊ कपड्यापासून विविध प्रकारच्या वस्तूंची पुनर्निर्मिती करण्यात येणार आहे. तयार करण्यात आलेल्या वस्तूंचे बाजारपेठेत प्रदर्शन करण्यात येणार असून त्यांची विक्रीही करण्यात येणार आहे. यामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचतगटांची मदत घेतली जाणार आहे.

हा प्रकल्प राबविल्याने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी जाणा-या कच-याचा भार काही अंशी कमी होणार असून कचरा कमी करण्याप्रमाणेच महिलांना रोजगारही उपलब्ध होणार आहे.

यामध्ये नागरिकांनी आपले पँट, शर्ट, जॅकेट, मोजे, पायजमे, स्कर्ट, ड्रेस, शॉर्टस, ब्लाउज, पुरुषांचे शर्ट तसेच लहान मुलांचे कपडे त्याचप्रमाणे चादरी, स्वच्छतेसाठी वापरण्याचे टॉवेल सारखे कपडे, ब्लँकेट, बेड स्प्रेड्स, रजई, कंफर्टर, पडदे अशी वस्त्र सामग्री द्यावी. तथापि अस्वच्छ किंवा दूषित कपडे व वस्त्र सामग्री, वैद्यकिय वापराचे कपडे, सॅनेटरी पॅड, गाद्या, लेदर पर्स, पादत्राणे, बेल्ट, औद्योगिक कापड, अंतर्वस्त्रे देऊ नयेत असेही सूचित करण्यात येत आहे.

वापरानंतरच्या वस्त्रांचे व्यवस्थापनाचा अभिनव प्रकल्प राबविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची देशातून निवड करण्यात आली ही सर्वच नागरिकांसाठी अभिमानाची गोष्ट असून नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम यशस्वी करण्यात आघाडीवर असणारी आपली महापालिका हा उपक्रमही यशस्वी करेल असा विश्वास व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आपल्या घरातील चांगल्या स्वरुपाचे टाकाऊ कपडे नागरिकांनी सोसायटीमध्ये दिलेल्या स्वतंत्र पेट्यांमध्ये जमा करावेत अथवा आपल्या जवळच्या थ्री आर सेंटरमध्ये ठेवावेत आणि हा अभिनव प्रकल्प यशस्वी करण्यासाठी संपूर्ण योगदान द्यावे असे आवाहन केले आहे.

## जेष्ठ समाजसेवक सदानंद येलवे यांना ‘समाजभूषण’

**माणगांव :** बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित ९८ वा चवदार तळे सत्याग्रह निमित्त माणगाव तालुक्यातील साई गावचे माजी गटप्रतिनिधी सदानंद येलवे जेष्ठ समाजसेवक तसेच सोनबा येलवे यांचे नातू त्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त २० मार्च चवदार तळे सत्याग्रह दिनी महाड क्रांतिस्तंभ या ठिकाणी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बौद्धजन पंचायत समिती या विचारमंच्यावर कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, उप सभापती विनोद मोरे, उप कार्याध्यक्ष चंद्रमणी तांबे,अतिरिक्त सरचिटणीस विठ्ठल जाधव, रवींद्र पवार, राजेश घाडगे,पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## खारघर येथे झालेल्या शिवकुमार शर्मा यांच्या मृत्यूस जबाबदार आयोजक संस्थेवर कारवाई करा

या प्रयत्नांनी येथे कायद्याला कुठल्याही प्रकारचे स्थान नाही अशी स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे या ठिकाणी असे प्रकार वारंवार घडणार असतील तर ती थांबवण्याची जबाबदारी शासनाची आहे. मुंबईची संस्था खारघरमध्ये आयोजन करते आणि नियम पायदळी तुडवते. त्यामुळे भविष्यकाळात असे कार्यक्रम आयोजनाला परवानगी देऊ नये, अशी मागणीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात केली.

गृहराज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांनी दिलेल्या उत्तरात म्हटले की, इज्तिमाच्या कार्यक्रमासंदर्भात आयोजकांनी सर्व परवानग्या घेतल्या होत्या. या ठिकाणी ६०० पोलीस आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले होते. आयोजकांचे ७०० व्हॉलेंटिअर त्या दिवशी कार्यरत होते. ही घटना कार्यक्रम स्थळापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर घडली. ओव्हरटेक करताना वाद झाला आणि त्यामध्ये आरोपीकडून मारहाण झाली. या प्रकरणाची तक्रार करण्यासाठी शिवकुमार शर्मा गेले असता ते जवळपास सात मिनिटे खारघर पोलीस ठाण्यात होते. दरम्यान, त्यांच्या तब्येतीत अस्वस्था निर्माण झाल्याने त्यांना पोलीस कर्मचाऱ्यांनी शेजारील रुग्णालयात उपचारासाठी नेले, मात्र त्यांच्या मृत्यू झाला. तत्पूर्वी त्यांचा जबाब घेतला असता यामध्ये तसेच काही साक्षीदारांनी गाडीला कट मारण्यावरून आपापसात वाद झाल्याचा जबाब दिला आहे. नियमात बसून जर कार्यक्रमाचे आयोजन केले जात असेल, तर परवानगी नाकारता येत नाही. तथापि भविष्यात असे कार्यक्रम घेत असताना व्यवस्थापनाचा विषय येतो; त्या वेळी आयोजक आणि त्या संबंधित विभागाने काळजी घेणे गरजेचे आहे. इज्तिमाच्या पहिल्या दिवशी पहिल्या दिवशी १५ हजार, दुसऱ्या दिवशी २५ हजार, तर तिसऱ्या दिवशी तीन लाख लोकं या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामुळे भविष्यात अशा परवानग्या देत असताना काळजी घेतली जाईल, असे मंत्री योगेश कदम यांनी आश्वासित केले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने ५८ दिवसांच्या परवानगीवर बोलताना या संदर्भात आपल्याला माहिती नसल्याचे सांगून त्याची माहिती घेणार असल्याचेही त्यांनी सभागृहाला सांगितले.

या वेळी परवानगीच्या विषयावर सूचना करताना तालिका अध्यक्ष योगेश सागर यांनी, एका संस्थेला मैदानासाठी ५८ दिवसांची परवानगी दिली असेल, तर ते अयोग्य असल्याचे अधोरेखित केले आणि गरजेपेक्षा जास्त दिवसांची परवानगी संदर्भ राज्यभर वापरला जाणार नाही यासाठी सरकारने विचार केला पाहिजे, असे निर्देश दिले. यावर मंत्री योगेश कदम यांनी गरजेपेक्षा जास्त दिवसांची परवानगी दिली जाणार नसल्याचे आश्वासन दिले.

## ‘मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती तातडीने अदा करा’

सन २०२३-२४मधील पात्र ३८६० विद्यार्थ्यांपैकी ३६८६ विद्यार्थ्यांना व सन २०२४-२५मध्ये पात्र ३४४८ पैकी २६३९ विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत राज्य हिश्याचा ४० टक्के निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित बहुतांशी अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असून हे अर्ज तातडीने निकाली काढण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६० टक्के हिस्सादेखील केंद्र शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये परस्पर अदा करण्यात येत असून विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना उद्भवणाऱ्या अडचणींबाबत राज्य शासनामार्फत वेळोवेळी उपाययोजना करण्यात येत आहे, असेही ना. शिरसाट यांनी उत्तरात नमूद केले.

## राजिप वेतन घोटाळ्यातील आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या वेतन फरकाच्या कोटयवधीच्या घोटाळयातील आरोपी जोतीराम वरुडे, महेश मांडवकर यांचा अटकपूर्व जामिन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश, रायगड-अलिबाग एस.डी. भगत यांनी फेटाळून लावला आहे.

अर्ज फेटाळताना न्यायालयाने या प्रकरणात इतर अधिका-यांचा सहभाग नाकारता येत नाही, असे महत्वपूर्ण निरीक्षण नांदविले आहे. न्यायालयाने या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी नाना कोरडे यांच्या पत्नी सोनाली नाना कोरडे यांचा अटकपूर्व जामीन मात्र मंजूर केला आहे.

प्रकरणाच्या निष्पक्ष आणि प्रभावी तपासासाठी अर्जदारांची कोठडीत चौकशी करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदार जोतीराम पांडुरंग वरुडे आणि महेश गोपीनाथ मांडवकर यांचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळण्यात येत आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील संतोष पवार यांनी जोरदार युक्तीवाद करून सरकारची बाजू मांडली.

रायगड जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्याने एक कोटी २३ लाख रूपयांची रक्कम परस्पर हडप केल्याचे प्रकरण समोर आले होते. रायगड एकात्मिक बाल विकास विभागातही नाना कोरडे, ज्योतिराम वरुडे व महेश मांडवकर या वेतन देयक तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी चार कोटी १२ लाख ३४ हजार ७७१ रुपयांचा असा एकूण पाच कोटी ३५ लाख ३४ हजार ७७१ रूपयांचा अपहार उघडकीस आला होता. या प्रकरणात नाना कोरडे याला अटक करण्यात आली. जोतीराम पांडुरंग वरुडे आणि महेश गोपीनाथ मांडवकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने तो फेटाळून लावला.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल येथे शिक्षण अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सुरू होत आहे. या स्कूलला शुभेच्छा देण्यासाठी रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथील माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे यांनी सदिच्छा भेट दिली.



या वेळी त्यांच्यासोबत मोहन कोंगेरे (विभागीय अधिकारी रायगड रयत शिक्षण संस्था), बाळासाहेब कारंडे (पीआरओ), संतोष गुर्जर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांचे स्वागत स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी केले.

यानंतर स्कूलच्या विविध विभागांची पाहणी करून मान्यवरांनी स्कूलच्या पुढील उज्वल वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## डॉ. पी.बी. आचार्य यांना पुरस्कार



**अलिबाग :** दक्षिण आफ्रिकेतील घाना येथील काफ युनिव्हर्सिटी आणि भारतातील उत्तरप्रदेशमधील लखनौ येथील सायन्स टेक इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमानाने बेस्ट फॅकल्टी अवॉर्ड इन फील्ड ऑफ कॉमर्स अँड मॅनेजमेंट ग्लोबल अकॅडमी रिसर्च एक्सलन्स (जीइआरए -२०२५) हा पुरस्कार अलिबाग येथील जे. एस. एम. महाविद्यालयातील कॉमर्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. बी. आचार्य यांना प्रदान करण्यात आला. त्यांच्या शोधनिबंधाला उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्कार देण्यात आला. तीन दिवसीय इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ऍडव्हान्स आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मल्टी डिसिप्लिनरी रिसर्च ऑनलाईन परिषद आयोजित करण्यात आली होती. या ऑनलाइन परिषदेमध्ये प्रा. डॉ. पी. बी. आचार्य यांना हा पुरस्कार देण्यात आला.

## दुरशेत रस्त्यावर आढळलेल्या महिलेचे रेखांकित व काल्पनिक चित्र पोलिसांच्या वतीने जारी



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दुरशेत गावच्या रस्त्यावर अज्ञात महिला मृतदेह बॅगेत सापडल्याने खळबळ उडाली होती. त्याचे शवविच्छेदन उपजिल्हा रुग्णालय, पेण येथे करण्यात आले. त्यावेळी या अज्ञात महिलेचा खून सात ते आठ दिवस अगोदर झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. त्यामुळे पूर्ण मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत होता. अखेर चित्रकारांच्या मदतीने मयत महिलेचे रेखांकित व काल्पनिक चित्र समोर आले आहे. अनोळखी मयत महिलेची माहिती समोर आली असून या महिलेचे अंदाजे वय २५ ते ३० वर्ष, रंग गोरा, उंची अंदाजे १४८ से.मी., उजव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीमध्ये ’ए’ असे गोंदविलेले, तसेच सदर महिलेच्या उजव्या पायाच्या अंगठ्यावर लाल रंगाची नेलपेंट लावलेली दिसत होती. तसेच केसाला काळ्या रंगाचा चाप, बोटामध्ये एक अंगठी, हातात लाल रंगाची बांगडी, मयत महिलेने परिधान केलेला गाऊन असे सर्व ऐवज आढळून आले होते.त्यानंतर पोलिसांनी रेखाचित्रकाराला बोलावून अज्ञात महिलेचे छायाचित्र काढण्यास सांगितले. त्यानुसार त्या महिलेचे काल्पनिक व रेखांकित चित्र पोलिसांच्या हाती लागले आहे.

छायाचित्रात असलेली महिला कुणाची नातेवाईक अथवा शेजारी असेल तर त्यांनी त्वरित पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल मोबा. ८६९२९९९१०० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**दुखवटा**

## सदाशिव साठे



**पाली :** ताडगाव ग्रामपंचायतचे प्रथम सरपंच कै. सखाराम दाजी साठे यांचे द्वितीय पुत्र व उद्योजक राजेंद्र साठे आणि सामाजिक कार्यकर्ते संजय साठे यांचे वडील सदाशिव सखाराम साठे (दादा) यांचे शुक्रवारी (ता.१४) वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांना पत्नी , मुले,सूना, मुली, जावई,पुतणे,नातवंड आणि पतवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी खालचा उद्धर रामेश्वर येथे रविवारी (ता.२३) होणार आहे. तसेच उत्तर कार्य सोमवारी (ता.२४) ताडगाव येथे राहत्या घरी होणार आहे .

## निवडक

### महामार्गावर दुचाकीस्वाराची लूट

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधील नावडे फाटा पुलावर एका दुचाकीस्वाराला त्रिकुटाने लुटले. दुचाकीस्वार विद्यार्थी मित्राचा वाढदिवस साजरा करुन कल्याण ते कामोठे या मार्गावर प्रवास करताना त्याची लूटमार करण्यात आली. तळोजा पोलीस संशयितांचा शोध घेत आहेत. मुंब्रा-पनवेल महामार्गापासून हाकेच्या अंतरावर नावडे फाटा पुलावर ही घटना घडली. तीन अनोळखी तरुण दुचाकीवरुन तेथे आले. त्यांनी विद्यार्थ्याची दुचाकी रस्त्यांलगत लावण्याचा इशारा केला. विद्यार्थ्याने दुचाकी थांबवल्यावर त्रिकुटाने दुचाकीची किल्ली काढून घेतली. त्याच्या गळ्यातील ४० हजार रुपयांची सोनसाखळी खेचून त्रिकुटाने पळ काढला.

### सीमाशुल्क विभागाच्या गोदामात चोरी

**पनवेल :** पनवेलमध्ये केंद्रीय सीमा शुल्क विभागाचे कंटेनरला लावलेले सील तोडून ५१ लाख रुपयांची चोरी करण्यात आली . या प्रकरणी तीन व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.सोमाटणे गावाजवळील अपोलो लॉजी सोल्युशन लिमिटेड या सीमा शुल्क विभागाच्या सीएफएस गोदामात ही चोरी झाली. याबाबतची तक्रार अभिजीत पाटील यांनी नोंदवली आहे. गोदामात श्रीपदम लॉजिस्टिकच्या वाहने ये-जा करण्याच्या परवान्यात फेरफार करुन ट्रक गोदामात आणण्यात आला. सीमा शुल्क विभागाने थांबवून ठेवलेल्या कंटेनरच्या दरवाज्याचे सील तोडून संगणकांचे प्रोसेसर, शिलाई मशीन मेटल स्टॅण्ड असा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला.

### १६ सिलिंडरसह रिक्षाची चोरी


**पनवेल :** खारघर उपनगरात दुकानासमोरून रात्रीच्या वेळी उभी केलेली तीन चाकी रिक्षा आणि रिक्षामधील १६ रिकामी गॅस सिलिंडरची चोरी झाली.खारघर उपनगरातील सेक्टर १२ येथील राजकुमार बिश्नोई यांची ही रिक्षा आहे.

# पनवेल मनपाच्या कर संकलनात दररोज वाढ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांधारकांचा गेल्या काही दिवसापासून मालमत्ता कर भरण्याकडे प्रतिसाद वाढला असून रोज सुमारे तीन-चार कोटी रुपयांचा भरणा पालिकेच्या तिजोरीत होत आहे. पनवेल महापालिकेच्या कर संकलनाचा मागील वर्षाचा विक्रम मोडल्यानंतर दररोज या उच्चांकांमध्ये वाढ होत असून नागरिकांचा मालमत्ता कर भरण्याकडे ओढा वाढू लागला आहे.

याआधी दिनांक १९ मार्च रोजी महापालिकेने मागील वर्षाचा विक्रम मोडित काढत उच्चांकी ३७० कोटीची वसुली केली होती. त्यानंतर आज २१ मार्च रोजी ३ कोटी ३४ लाखाचा भरणा झाला असून आता या आर्थिक वर्षामधील एकुण ३७६ कोटीचा एकूण मालमत्ता कर जमा झाला आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या



आदेशानुसार महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरोधोत मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या विविध जप्ती व अटकावणी पथकाच्या माध्यमातून वेगाने कारवाई केली जात आहे. परिणामी महापालिका मालमत्ताकर वसुलीचा रोज एक विक्रम करत आहे.

तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन व इतर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याने महापालिकेचे बळ वाढले असून, महापालिका आता ॲक्शन मोडमध्ये आली आहे.

थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. आयुक्तांनी दिलेल्या आदेशनुसार मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवर प्रत्येक विभागातील वसुली पथक कारवाई करत आहे. करअधीक्षक महेश गायकवाड तसेच कर अधीक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून चारही प्रभागातून उच्चांकी वसुली केली जात आहे.

दरम्यान, मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने सातत्याने करण्यात येत आहे.

# तीनचाकी प्रवासी रिक्षांकरिता पसंतीचे नोंदणी क्रमांक उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्या कार्यकक्षेमधील वास्तव्य करणाऱ्या तथा व्यवसायाचा पत्ता असलेल्या व परिवहनेतर संवर्गात वाहन नोंदणी करू इच्छिणाऱ्या वाहन धारकांकरीता V-II-N 4.0 या संगणक प्रणालीवर सद्यस्थितीत कार्यन्वित असणारी एम एच४६-बीपी ही मालिका संपुष्टात येणार असल्याने एम एच ४६-सीवाय ही नवीन मालिका सुरू करण्यात येणार असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल जयंत चव्हाण यांनी दिली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४ (अ) अन्वये नवीन नोंदणी मालिकेतील आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करून सदर क्रमांक आरक्षित करण्यासाठी ईच्छूक नागरीकांकडून दि. २४ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० या कार्यालयीन वेळेमध्ये अर्ज स्विकारले जातील. तसेच आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी प्रतिनिधी असतील तर संबंधीत प्रतिनिधीस प्राधिकृत केल्याबाबतचे विहीत प्राधिकारपत्र अर्जासह सादर करणे बंधनकारक आहे.

आकर्षक व पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी केलेले अर्ज मंजूर झाल्यास अर्जदाराने त्याच दिवशी अथवा पुढील कार्यालयीन दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० या कार्यालयीन वेळेमध्ये सदर पसंती क्रमांकाकरीता विहीत करण्यात आलेले शुल्क धनाकर्षाद्वारे भरणा करणे आवश्यक आहे.तद्नंतर आकर्षक वाहन नोंदणी क्रमांकासाठी शासन अधिसुचनेद्वारे विहीत केलेले शुल्क धनाकर्षाद्वारे स्विकारून आकर्षक व पसंतीचे आरक्षित करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

जर एका नोंदणी क्रमांकासाठी एका पेक्षा अधिक अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यास सदर पंसती क्रमांक लिलाव पध्दतीने जारी करण्यात येईल.लिलाव पध्दतीने पसंती क्रमांक जारी करण्यासाठी जो पसंती वाहन क्रमांक हवा आहे त्या क्रमांकासाठी विहीत रक्कमेचा डी.डी. कार्यालयात जमा करावा व लिलावासाठी ऐच्छिक रक्कमेचा वेगळा डी.डी. बंद लिफाफ्यात दि.२५ मार्च २०२५ रोजी दु. ०१.०० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावा. दोन्ही डी.डी. कार्यालयात जमा केल्यानंतर दि.२५ मार्च २०२५ रोजी दु.०४.०० अर्जदारांची बंद पाकीटे त्यांचे समक्ष प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उघडण्यात येतील. ज्यांचा ऐच्छिक रक्कमेचा डी. डी. स्विकृत डी.डी. पैकी सर्वाधिक रकमेचा असेल त्या अर्जदारास सदर पसंती क्रमांक देण्यात येईल. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचनेनुसार आकर्षक/ पसंतीच्या नोंदणी क्रमांकाचे शुल्क भरणा केलेच्या दिनांकापासून १८० दिवसांपर्यंत संबंधित क्रमांक आरक्षित राहील. या कालावधीत वाहनाची नोंदणी न केल्यास १८० दिवसानंतर सदर आरक्षित वाहन क्रमांक हा अनारक्षित समजला जाईल व भरलेल्या शुल्काचा परतावा केला जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

या नोंदणी क्रमांकासाठी विहीत रक्कमेचा डी.डी. व लिलावासाठी ऐच्छिक रक्कमेचा वेगळा डी.डी. असे दोन्ही डी.डी. कार्यालयात जमा करावे. पसंती क्रमांक लिलाव प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय व सर्वाधिकार नोंदणी प्राधिकारी यांचे राहतील

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २१ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजता परिसंवाद, कार्यशाळा व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वर्गासाठी प्रशासन कौशल्ये आणि व्यावसायिक शिष्टाचारावर एक दिवसीय शिक्षक विकास कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून जी के सुर्वे हेड क्लर्क चांगु काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल यांनी उपस्थित राहून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशासनातील कार्यक्षमता कशी वाढवावी, प्रशासकीय कौशल्ये तसेच कामाच्या ठिकाणी व्यावसायिक शिष्टाचारांचे महत्त्व याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले तसेच कार्यस्थळी शिष्टाचार, संवाद कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, आणि टिम वर्क यामुळे कर्मचार्यांना आपल्या कामाच्या ठिकाणी अधिक व्यवस्थित आणि कार्यक्षम बनण्यास मदत होईल हेही नमूद केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी त्यांच्या अध्यक्षीय मनोगतामध्ये कर्मचारी वर्गाच्या महत्त्वावर जोर दिला आणि त्यांना अधिक सक्षम आणि कार्यक्षम होण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विकास करण्याचे महत्त्व स्पष्ट केले तसेच, प्राचार्यांनी कर्मचार्यांना कशाप्रकारे वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये प्रशासनिक कामे करावीत याबाबत मार्गदर्शन केले. या एकदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी परिसंवाद व कार्यशाळा समितीचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते तसेच कर्मचारी वर्गाने या कार्यक्रमाची खूपच सकारात्मक प्रतिक्रिया दिली असून, त्यांनी अशा प्रकारच्या सत्रांचे आयोजन नियमितपणे करावेत, अशी इच्छा व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रथमेश उदेकर यांनी केले तसेच या कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी सर्वांचे आभार मानले आणि भविष्यात असे उपक्रम सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिसंवाद व कार्यशाळा समितीतील प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. स्नेहा नाईक व प्रा. आनंद शेलार व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## खारघरची दारूमुक्त शहर म्हणून ओळख कायम राहावी -आमदार विक्रांत पाटील

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघर शहर हे दारुमुक्त शहर म्हणून ओळखले जाते. शहराच्या निर्मिती पासून आजपर्यंत दारूमुक्त शहर म्हणून ही ओळख कायम राखण्यात नागरिकांना आणि प्रशासनाला यश आले होते, पण आता काहींनी या गोष्टीला गालबोट लावण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. या ज्वलंत विषयाकडे अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार विक्रांत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.

खारघर परिसर स्वच्छ, सुंदर आणि सर्व मूलभूत सोयींनी सुसज्ज असून शैक्षणिक हब म्हणून ओळखला जातो. येथे भारती विद्यापीठ, सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज, ए.सी. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज व यांसारख्या अनेक प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे व त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर तरुणाई शिकत आहे. या सर्व युवाशक्तीच्या भवितव्यासाठी आणि खारघरवासीयांच्या भावना लक्षात घेता या भागात मद्य विक्री परवाने दिले जाऊ नये व दिलेले परवाने तातडीने रद्द करावे ही मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी केली.

यापूर्वीही काही समाजकंटकांनी खारघर परिसरात अवैध दारू विक्री करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र स्थानिक नागरिकांनी संघर्ष समितीच्या माध्यमातून या प्रयत्नांना तीव्र विरोध करून हा कट उधळून लावला होता. खारघर शहर दारूमुक्त असावे असा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या महासभा सभागृहातसुद्धा करण्यात आलेला आहे. आमदार विक्रांत पाटील यांच्या या दारूविक्रीविरोधी भूमिकेचे खारघरवासीयांकडून स्वागत केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांना १०० सायकलींचे वाटप



**रसायनी : प्रतिनिधी**

पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अल्काईल अमाइन्स केमिकल्स लिमिटेड यांनी सी एस आर निधीतून गरजू, हुशार आणि दुर्गम भागातून येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना १०० सायकलींचे वाटप केले.

अल्काईल अमाइन्सच्या कॉलनीत झालेल्या या समारंभासाठी मोहोपाडा ग्रामपंचायत सरपंच मुंढे, अल्काईल अमाईन्सचे सिनियर मॅनेजर एच.आर. मॅथ्यू डीकुन्हा, पाताळगंगा एच आर अर्चना मॅडम, सी एस आर ऑफिसर निकिता म्हात्रे यांनी सी एस आर कन्सल्टंट रवींद्र ओंकार उपस्थित होते.

गेल्या वर्षी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळून शाळेतील उपस्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून आल्याने यंदा हा उपक्रम पुन्हा करण्यात आला. अल्काईल अमाइन्स आपल्या समाजाच्या भल्यासाठी सदैव कटिबद्ध असुन भविष्यातही अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम सुरू राहतील अशी खात्री मॅथ्यू डीकुन्हा यांनी व्यक्त केली.







**उरण :** आमदार महेश बालदी यांच्या मातोश्री गंगादेवी रतनलाल बालदी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, मत्स्य व्यवसाय व बंदरेमंत्री नितेश राणे, रोहयोमंत्री भरत गोगावले, आमदार सर्वश्री गोपीचंद पडळकर, संजय बनसोडे, विनय कोरे, महेंद्र दळवी यांनी आमदार महेश बालदी यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्व. गंगादेवी यांना आदरांजली अर्पण केली व बालदी परिवाराचे सांत्वन केले. सोबत शिवसेनेचे पनवेल तालुकाध्यक्ष रघुनाथ पाटील, रूपेश ठोंबरे, अलिबाग तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी.

# शिवशक्ती मित्र मंडळामार्फत हिंदू संस्कृती जपण्याचे काम -रमेश गुडेकर

**पनवेल: वार्ताहर**

हिंदू संस्कृती जपण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून शिवशक्ती मित्र मंडळामार्फत केले जात आहे. यासाठी सातत्याने परिसरात हिंदू सण, उत्सव सर्वजण एकत्रित येवून मोठ्या उत्साहात साजरा करतात. हेच या मंडळाचे वैशिष्ट्य असल्याचे मत माजी नगरसेवक व रायगड भूषण, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांनी बक्षीस समारंभ कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमास डॉ. अजिंक्य पाटील, उद्योजक राजाभाऊ गुप्ते, ज्येष्ठ पत्रकार सुनील पोतदार व संजय कदम, युवा उद्योजक स्वप्नील गुप्ते, ज्येष्ठ शिवसैनिक अरुण ठाकूर, अध्यक्ष संदीप पाटील, रवी गोरे, माजी नगरसेविका नीता नरसाळे, शहर संघटका अर्चना कुलकर्णी, पूजा पडवळ आदी मान्यवर व्यासपिठावर



उपस्थित होते.

यावेळी बोलताना गेल्या अनेक वर्षापासून शिवशक्ती मित्र मंडळ सातत्याने समाजोपयोगी कार्यक्रम करीत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण पिढी येथे आकर्षित झाली असून ते प्रत्येक कार्यक्रमात सहभाग घेत असल्याचे त्यांनी सांगितले. तर उद्योजक राजाभाऊ गुप्ते यांनी सुद्धा मंडळाचे कौतुक करून हे मंडळ म्हणजे पनवेलचा जिता-जागता इतिहास आहे. येथे प्रत्येक सण, उत्सव साजरे केले जातात व त्यात सर्वांचा सहभाग असतो हे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सुनील पोतदार यांनी सांगितले की, राजकारण विरहित हे मंडळ असून आमचे पक्ष वेगवेगळे असले तरी रमेश गुडेकर, अरुण ठाकूर यांची मैत्री ही जुनी आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या अडीअडचणीला आम्ही धावून जात असतो असे त्यांनी सांगितले.

शिवशक्ती मित्र मंडळातर्फे होळी तसेच शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# वीर वाजेकर महाविद्यालय आणि अंजुमन इस्लाम महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार

**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंडे, (उरण) आणि अंजुमन इस्लाम महाविद्यालय, मुरुड यांच्यात इचड (व्यवस्थापन अध्ययन), वाणिज्य आणि (माहिती तंत्रज्ञान) विभागांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक विकासाला चालना देणे, तसेच दोन्ही महाविद्यालयांमध्ये संशोधन व कौशल्यविकास उपक्रम राबवणे हा आहे.



या कराराच्या माध्यमातून उपक्रम राबवले जातील:त्यात १)विद्यार्थी आणि प्राध्यापक आदान-प्रदान कार्यक्रम २) संयुक्त संशोधन प्रकल्प आणि कार्यशाळा ३)कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण ४) संघटित औद्योगिक भेटी आणि इंटर्नशिप संधी ५) संयुक्त सेमिनार आणि करिअर मार्गदर्शन सत्रे आदी उपक्रम राबवले जातील

वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांनी या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, हा करार विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक, संशोधन आणि व्यावसायिक संधी निर्माण करेल. इचड, वाणिज्य आणि B.Sc. IT विभागातील विद्यार्थी व्यावहारिक ज्ञान मिळवून उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रात स्वतःला सिद्ध करू शकतील.

अंजुमन इस्लाम महाविद्यालय, मुरुडचे प्राचार्य डॉ. सजिद एफ. शेख यांनीही या कराराचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, उच्च शिक्षणात गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा करारांची अत्यंत गरज आहे. आम्ही या सहकार्याचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी वचनबद्ध आहोत.

या सामंजस्य करारामुळे दोन्ही महाविद्यालयांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण होईल, उद्योग आणि शिक्षण यामधील दरी भरून काढली जाईल आणि विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअरसाठी नव्या संधी उपलब्ध होतील.

## संपादकीय

# सत्य दडपले जायला नको

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन हिचे मृत्यू प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून गेले दोन दिवस राज्यातील राजकारणात या प्रकरणाने खळबळ उडवून दिली आहे. प्रकरण कुठलेही असो, सत्तेचा दुरुपयोग करून सत्य दडपण्याचा प्रयत्न झाल्यास ते अयोग्यच म्हटले पाहिजे.

**चित्रपटसृष्टीतील सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची पुन्हा चौकशी करण्याची मागणी केली आहे. सामुहिक बलात्कार करून दिशाची हत्या केल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. उबाठा सेनेचे आमदार आदित्य ठाकरे यांचाही उल्लेख सालियन यांनी याचिकेत केल्याने या प्रकरणाचे पडसाद अर्थसंकल्पीय अधिवेशनातही उमटले. विधिमंडळाच्या आत आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आमदारांमध्ये या प्रकरणावरून खडाजंगी झाली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणासंदर्भातील सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. ही सगळी चर्चा न्यायालयातील याचिकेमुळे पुन्हा सुरू झाली. न्यायालय यावर काय म्हणते, न्यायालयात कोणते पुरावे समोर ठेवले जातात यावर सरकारची पुढील भूमिका ठरेल असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. हा विषय आतातरी सरकारच्या किंवा पोलिसांच्या पातळीवर नाही. न्यायालय ज्या प्रकारे आम्हाला आदेश देईल किंवा न्यायालयात जर काही नवीन पुरावे आले तर त्या आधारावर त्यावेळी सरकार निर्णय घेईल. आतातरी आम्ही न्यायालयाकडे नजर ठेवून आहोत, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. दिशा ही अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी व्यवस्थापक होती. ८ जून २०२० रोजी मुंबईत दिशा सालियनचा तिच्या होणाऱ्या नवऱ्याच्या मालवणी येथील घराच्या बाल्कनीमधून पडून मृत्यू झाला. पोलिसांनी त्यावेळी आत्महत्येची नोंद केली होती. मृत्यूपूर्वी त्या दिवशी दिशा, तिचा होणारा नवरा व मित्रमंडळी पार्टी करत होते. त्यादरम्यान ती बेडरूममध्ये गेली. नंतर तिच्या मित्रांनी खोलीचा दरवाजा उघडला असता ती खोलीत नव्हती. खिडकीतून पाहिले असता त्यांना दिशा पडलेली दिसली अशी माहिती तेव्हा पोलिसांकडून देण्यात आली होती. आपल्या मुलीचा अपघाती मृत्यू झाल्याचे त्यावेळी भासवण्यात आले, मात्र तिचा मृत्यू अपघाती नसून तिच्यावर सामुहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचे सतीश सालियन यांनी आता याचिकेत म्हटले आहे. त्या दिवशीच्या पार्टीत काही प्रभावशाली व्यक्ती सहभागी होत्या असा आरोप यापूर्वीही झाला आहे. दिशाच्या मृत्यूनंतर काही दिवसांतच सुशांतनेही आत्महत्या केली. या दोघांच्या मृत्यूविषयी निर्माण झालेले गूढ अजुनही कायम आहे. दिशाच्या वडिलांच्या नव्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनीही आपली भूमिका मांडली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयात आरोपांवर जे उत्तर द्यायचे ते आम्ही देऊ असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, दिशाच्या वडिलांच्या नव्या याचिकेनंतर आता या प्रकरणी नव्याने तपास होईल का, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. सत्तेचा दुरुपयोग करून सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला असल्यास पुन्हा या प्रकरणाची चौकशी होऊन न्याय व्हायला हवा. दिशाच्या वडिलांनी याचिकेत या प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणीही केली आहे. दिशाच्या मृत्यूचा तपास सीबीआयकडे सोपवला जाईल का आणि त्या तपासातून सत्य बाहेर येईल का, हे येणारा काळच सांगू शकेल.**

# म्हणून साजरा केला जातो जागतिक जल दिन



पाणी म्हणजे जीवन म्हटले जाते. जीवन जगण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. बदलत्या हवामानामुळे जलसंवर्धनाची गरज वाढली आहे. त्याबाबत जनतेला जागरुकता करण्यासाठी 'जागतिक जल दिन' साजरा करण्यात येतो. त्यासाठी शाळांसह सरकारी कार्यालय आणि स्वयंसेवी संस्थांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

जागतिक जल दिनाचा काय आहे इतिहास? ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथे संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेने जागतिक जल दिन साजरा करण्याचा १९९२मध्ये निर्णय घेतला. त्यानंतर दरवर्षी २२ मार्चला जागतिक जल दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. शेतीसह विविध उद्योग आणि उर्जानिर्मितीसाठी पाण्याची गरज असते. मात्र, देशाच्या विविध भागांमध्ये पाण्याची टंचाई आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीनं वापर करून जलसंवर्धन करणं ही काळाची गरज ठरत आहे. समृद्धीसाठी आणि शांततेसाठी पाणी ही संकल्पना घेऊन यंदा जागतिक जलदिन साजरा करण्यात येतो.

जगण्यासाठी पाणी अत्यंत गरजेचे आहे. पाण्याशिवाय मनुष्य, प्राणी, सजीवसृष्टीची कल्पनाही करता येणार नाही. ताज्या पाण्याचे महत्त्व आणि या नैसर्गिक स्त्रोताच्या व्यवस्थापनाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २२ मार्च रोजी जागतिक जल दिन साजरा केला जातो. पृथ्वीवर पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असले तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी वापरासाठी योग्य आहे. बाकी सर्व खारे पाणी आहे, जे सेवन करता येत नाही. त्यामुळे भावी पिढ्यांसाठी पाण्याचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे.

पाणी हेच जीवन आहे. पाण्याशिवाय सजीवसृष्टी याची कल्पनाही करता येणार नाही. हे सर्व असतानाही ३० वर्षापासून पाण्याचे महत्व पटवून देण्यासाठी हा जागतिक जल दिन साजरा केला जात आहे. काळाच्या ओघात जलस्त्रोत बदलले असले तरी पाण्याचा अपव्यय हा सुरुच आहे. त्यामुळेच २१व्या शतकातही पाण्याचे संकट हे सर्वांसमोरच आहे. पाण्यासंबंधीच्या आव्हानावर मात करण्यासाठी निसर्गाचा कसा उपयोग करून घेता येईल याची संकल्पना या जागतिक जल दिनाच्या निमित्ताने सर्वांसमोर मांडली जाते. किमान यामधून का होईना पाण्याचे महत्व सर्वांच्या लक्षात येईल आणि पाण्याचा सदउपयोग केला जाईल. पिण्यायोग्य पाण्याचे निसर्गातील प्रमाण हे अत्यंल्प आहे. त्याचा जपून वापर करणे हीच काळाची गरज आहे. एवढेच नाही तर पाणी टंचाई आणि पाण्याचा अपव्यय असाच झाला तर तिसरे युध्द हेदेखील पाण्यासाठीच होईल अशी भविष्यवाणी वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे पाण्याचे महत्व प्रत्येकाला पटवून देण्यासाठी हा २२ मार्च जागतिक जल दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने जनजागृतीचे कार्यक्रमही राबवले जातात.

### जल दिन साजरा करण्याची मूळ संकल्पना

जागतिक जल दिन साजरा करण्याचा आंतरराष्ट्रीय पुढाकार ब्राझीलमध्ये २२ मार्च १९९२ रोजी रिओ दि जानेरो येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण आणि विकासाच्या परिषदेत घेण्यात आला. १९९३मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने महासभेत हा दिवस वार्षिक कार्यक्रम म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. काळाच्या ओघात पाण्याचे महत्व तर सर्वांच्या लक्षात आले पण जल संवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती केली जात नाही. तहान लागल्यावरच विहीर खोदून प्रश्न सुटणार नाही तर त्यासाठी नियोजन हाच महत्वाचा भाग आहे. त्यामुळे जल संवर्धनाची सुरवात स्वत:पासून व्हावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### जलस्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी अशीही तरतूद

पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक तरतूदींचा समावेश असलेल्या कायद्याचा मसुदा केंद्र शासनाने सर्व राज्यांना सन १९६८मध्ये देऊ केला होता. भूजल वापराच्या विविध बाबी, त्याच्या उपलब्धतेसंबंधी तांत्रिक, शास्त्रीय आणि सुयोग्य विकासाच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा विचार करता पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत संरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनाने महाराष्ट्र भूजल अधिनियम-१९९३ तयार केला. १९९३ सालच्या या कायद्याचा मुलभूत हेतू पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर आधारित स्त्रोत सुरक्षित ठेवणे हा आहे.

### ...तर तिसरे महायुद्ध पाण्यासाठी

तिसरे महायुध्द देखील पाण्यासाठीच होईल अशी भविष्यवाणी संयुक्त राष्ट्राच्या सहाव्या सरचिटणीस, बुतरस घाली यांनी केली होती. जर लोकांना वेळीच पाण्याचे महत्त्व कळले नाही तर पुढील महायुद्ध पाण्यासाठी होईल. एवढी दाहकता असतानाही पाण्याचा योग्य प्रकारे वापर केला जात नाही, मात्र आजच्या दिनाचे औचित्य साधताना पाण्याचा योग्य वापर करण्यासंदर्भात ज्या सूचना आवाहन केले जाते त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली तर या जागतिक जल दिन साजरा करण्याचा उद्देश साध्य होणार आहे. **(साभार : इंटरनेट)**

# अभिनेते आणि दिग्दर्शक मिथुन गणेशन

रामास्वामी गणेशन (१७ नोव्हेंबर १९२० -२२ मार्च २००५), जे त्यांच्या रंगमंचावरील नाव जेमिनी गणेशन या नावाने ओळखले जातात. ते एक भारतीय अभिनेते होते ज्यांनी प्रामुख्याने तमिळ चित्रपटांमध्ये काम केले. चित्रपटांमधील त्यांच्या रोमँटिक भूमिकांसाठी त्यांना काधल मन्नन (प्रेमाचा राजा) असे संबोधले जात असे.

जेमिनी गणेशन हे तमिळ चित्रपटातील तीन सर्वात मोठ्या नावांपैकी एक होते, इतर दोन म्हणजे एमजी रामचंद्रन आणि शिवाजी गणेशन. शिवाजी गणेशन यांनी नाट्यमय चित्रपटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि एमजी रामचंद्रन ॲक्शन हिरो म्हणून लोकप्रिय होते, तर जेमिनी गणेशन त्यांच्या रोमँटिक चित्रपटांसाठी ओळखले जात होते.



जेमिनी गणेशन यांचा जन्म पुडुक्कोटाई रियासत, ब्रिटिश भारत आता पुडुक्कोटाई, तमिळनाडू रोजी झाला. त्यांनी रसायनशास्त्रात पदवी प्राप्त केली आणि काही काळ त्यांच्या अल्मा मॅटर, मद्रास ख्रिश्चन कॉलेज, तांबरम येथे शिक्षक म्हणून काम केले आणि नंतर जेमिनी स्टुडिओमध्ये कास्टिंग असिस्टंट म्हणून नोकरी स्वीकारली. याच संघटनेमुळे त्यांना जेमिनी हे टोपणनाव मिळाले. चित्रपटांच्या जगात गणेशन यांचा पहिला प्रवेश दिग्दर्शकाच्या सहाय्यक म्हणून (आणि थोडक्यात अभिनेता म्हणून) मिस मालिनी (१९४७) या चित्रपटात झाला. सुरुवातीला त्यांना कोणाचेही लक्ष नव्हते, परंतु थाई उल्लम (१९५२; मदर्स हार्ट) या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेनंतर गणेशन यांना ओळख मिळाली.

गणेशन यांच्या चित्रपट कारकिर्दीत पाच दशके झाली आणि त्यात सुमारे २०० चित्रपटांचा समावेश होता. त्यापैकी बहुतेक तमिळ भाषेत होते, तर काही हिंदी , तेलगू , मल्याळम आणि कन्नड भाषेत होते. त्यांच्या अनेक पुरस्कारांमध्ये कलाइमामणी पुरस्कार (तामिळनाडू राज्याकडून कला क्षेत्रातील कलाकारांना दिला जाणारा), एमजीआर सुवर्णपदक आणि फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार (फिल्मफेअर मासिकाद्वारे प्रदान केला जाणारा) यांचा समावेश आहे. १९७१मध्ये त्यांना भारताच्या सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेला पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# वीज वाचवायची असेल तर एसी किती तापमानावर ठेवावा?

तुम्हाला माहितीये का तुमचा एसी कोणत्या तापमानावर ठेवला तर तुमचे वीज बिल कमी येईल? तुम्हाला माहितीये का तुमचा फ्रिज कोणत्या नंबरवर ठेवला तर वीज कमी वापरेल? नाही ना...



हे माहिती करून घेण्यासाठी आपल्याला थोड्याशा माहितीची गरज आहे. तुमच्या एसी, फ्रिजवर हे आकडे लिहिलेले असतात परंतू त्यांचा अर्थ आपल्याला कळत नाही.

प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरणावर ते किती वॅट वीज वापरते हे लिहिलेले असते. उदाहरण घेऊया... जर एखाद्या उपकरणावर २०० वॅट असे चिन्हांकित केले असेल, तर ते दर ५ तासांनी १ युनिट (kWh) वीज वापरेल. त्याची गणना करण्यासाठी, तुम्ही हे सूत्र वापरू शकता: पॉवर (वॅट्स) ÷ वेळ (तास) × १००० = युनिट्स (kWh)


जर तुम्हाला तुमच्या एसी, फ्रिजच्या वीज वापराची माहिती जाणून घ्याची असेल तर एक काम करू शकता. तुम्ही ती उपकरणे बंद करावीत. नंतर वीज मीटरचे रिडिंग घ्यावे. आता तुम्हाला ज्याची माहिती हवी आहे ते उपकरण चालू करा आणि पुन्हा मीटर रिडिंग घ्या. यावरून ते उपकरण किती वीज वापरते याची माहिती मिळेल.

रेफ्रिजरेटर सहसा दररोज ०.५ ते १ युनिट वीज वापरतो. जर तुमचा रेफ्रिजरेटर खूप मोठा असेल किंवा त्याची कूलिंग क्षमता जास्त असेल तर विजेचा वापर देखील वाढणार हे लक्षात ठेवावे. फ्रिजमध्ये आत नॉब दिलेला असतो व चार्टही असतो. त्यानुसार खटका फिरवावा. एलईडी टीव्ही प्रति तास सुमारे ५० ते १५० वॅट वीज वापरू शकतात आणि जुने सीआरटी टीव्ही २०० वॅटपर्यंत वीज वापरू शकतात. वॉशिंग मशीनचा वीज वापर त्याच्या मॉडेल आणि मोडवर अवलंबून असतो, परंतु सरासरी ते प्रति तास ४०० ते १५०० वॅट्स घेऊ शकते.

**एसी कोणत्या टेम्परेचरवर ठेवावा...**

तुमचा एसी जर तुम्हाला जास्त वीज वापरू नये असे वाटत असेल तर तुम्ही तो २४ ते २६ या टेम्परेचरवर सेट करावा. थंड हवे असेल तर २४, साधारण थंड हवे असेल तर २६.

# पटकथाकार मधुसूदन कालेलकर



## निमित्त

मधुसूदन कालेलकर हे मराठी नाटककार, कथाकार, कवी, गीतकार आणि पटकथाकार होते. त्यांचा जन्म २२ मार्च १९२४ रोजी वेंगुर्ले येथे झाला. शालेय शिक्षण वेंगुर्ल्यात झाल्यावर ते मुंबईत आले. सुरुवातीस ते गिरगावात राहण्यास आले. तिथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने त्यांनी त्यांचे पहिले नाटक लिहिले आणि आपल्या लिखाणाचा श्रीगणेशा केला.

राजा नेने यांच्या हाताखाली काम करून त्यांनी चित्रीकरण आणि पटकथालेखन यांचा अनुभव मिळविला. त्यानंतर फिल्मिस्तान या संस्थेत त्यांना सेवा करण्याची संधी मिळाली. त्यांची पटकथा असलेले एकाहून एक दर्जेदार चित्रपट यशस्वी होऊ लागले आणि सिद्धहस्त पटकथालेखक म्हणून त्यांचा लौकिक झाला. एकामागोमाग एक असे त्यांचे ७५पेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित झाले. स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी लिहिलेले 'उद्याचे जग' हे त्यांचे पहिले नाटक. त्यांची एकंदर तीसहून अधिक नाटकं प्रदर्शित झाली. त्यात त्यांनी अनेक विषय हाताळले आहेत. कौटुंबिक, गंभीर, विनोदी आणि सामाजिकही. त्यांची लोकप्रिय अशी नाटकं. सहज भाषा आणि पकड घेणारे संवाद त्यामुळे ही नाटके चित्ताकर्षक ठरली.

कालेलकरांनी एकूण २९ नाटके आणि मराठी व हिंदी मिळून १११ चित्रपटांसाठी लिखाण केले. त्यात त्यांनी कौटुंबिक, गंभीर, विनोदी, सामाजिक असे अनेक विषय हाताळले आहेत. त्यांचे काही प्रमुख हिंदी चित्रपट 'बात एक रात की,' 'ब्लफ मास्टर,' 'झुमरू,' 'फरार,' 'दुल्हन वही जो पिया मन भाये,' 'अखियों के झरोखों से,' 'गीत गाता चल,' इत्यादी होते. त्यांनी चार नाटकांची निर्मिती केली. अनेक नाटकांचे गुजराती भाषेत प्रयोग झाले, तर तीन ते चार नाटकांवर हिंदी व मराठीत चित्रपटही झाले आहेत.

'आम्ही जातो आमुच्या गावा', 'पाहू रे किती वाट', 'अपराध', 'जावई विकत घेणे आहे', 'अनोळखी', 'गुपचूप गुपचूप', हे त्यांचे चित्रपट आहेत. 'बाळा गाऊ कशी अंगाई' या चित्रपटातील निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, या आजतागायत अंगाई म्हणून घरांघरांत सुपरिचित असलेल्या गीतासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट गीत लेखनाचे पारितोषिक देण्यात आले. साहित्य हा त्यांचा आवडता विषय होता, तर नाटकाविषयी प्रेम होते. 'अखेर जमलं' या मराठी चित्रपटासाठी त्यांनी विनोदी कथा लिहिली आणि तो चित्रपट चांगलाच गाजला.

त्यांच्या 'अपराध मीच केला,' 'सागरा प्राण तळमळला' व 'शिकार' या नाटकांना महाराष्ट्र शासनाचे सर्वोत्कृष्ट साहित्यिक कलाकृतीचे पारितोषिक मिळाले. 'हा माझा मार्ग एकला', या त्यांनी लिहिलेल्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवात त्यांना एकूण नऊ वेळा सर्वोत्तम कथा, पटकथा व संवाद यांसाठी पुरस्कार मिळाला आहे. या व्यतिरिक्त त्यांना तीन वेळा रसरंग फाळके गौरवचिन्ह पुरस्कार देण्यात आला आहे. अशा या प्रतिभाशाली लेखकाचे १७ डिसेंबर १९८५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)




## आरोग्य प्रहर

# अपुरी झोप तुमच्या हृदयाला ठरतेय घातक!

कमी झोपेचा हृदयविकाराचा धोका वाढण्याशी आणि अकाली मृत्यूशी संबंधित आहे. बीएमसी मेडिसिन या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात यूके बायोबँकमधील ३००,०००हून अधिक मध्यमवयीन प्रौढांच्या आरोग्यसंबंधीत डेटाचे विश्लेषण करण्यात आले. दक्षिण डेन्मार्क युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने सिडनी विद्यापीठातील संशोधकांनी हे संशोधन केले. या संशोधनात असे आढळून आले की, निरोगी झोपणाऱ्यांच्या तुलनेत कमी झोपणाऱ्यांमध्ये हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीत आजारांचा धोका वाढतोय.



विशेषत: कमी झोप घेणाऱ्या आणि श्वासोच्छवासाचे विकार असलेल्या पुरुषांचे आयुष्य सामान्य आरोग्य असलेल्या पुरुषांच्या आयुष्यापेक्षा सात वर्षांनी कमी होत आहे, तर महिलांमध्ये हेच प्रमाण सात वर्षांपेक्षा जास्त आहे, असेही अभ्यासात नमूद आहे. अपुरी झोप, निद्रानाश, घोरणे, उशिरा झोप लागणे आणि दिवसा झोप न लागणे यासारख्या झोपेसंबंधीत समस्यांमुळे पुरुष आणि स्त्रियांच्या हृदयाचे सामान्य आरोग्य सुमारे दोन वर्षांनी कमी होत आहे. यामुळे रोजच्या अपुऱ्या झोपेमुळे वृद्धापकाळात हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे सिडनी विद्यापीठातील प्राध्यापक आणि अभ्यासाचे वरिष्ठ लेखक इमॅन्युएल स्टामाटाकिस यांनी सांगितले.

स्लीप एपनिया हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि इतर जुनाट रोगाचा धोका वाढवण्यासाठी कारणीभूत ठरते. यामुळे सर्वसाधारणपणे खराब झोप हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण धोका निर्माण करू शकते, असेही स्टामाटाकिस यांनी एका निवेदनात म्हटले आहे. संशोधकांनी झोपेचे कमी, मध्यम व निरोगी असे तीन श्रेणीत वर्णन केले. याच झोपेच्या श्रेणीनुसार वृद्धापकाळ आणि आरोग्याच्या परिणामांची तुलना केली तसेच यात हृदय आणि रक्तवाहन्यांसंबंधीत आरोग्याचीही तुलना केली आहे.

कमी झोप असलेल्या महिलांना निरोगी झोपणाऱ्यांच्या तुलनेत हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांमुळे आरोग्याशी दोन वर्षे तडजोड करावी लागते, तर पुरुषांना दोन वर्षांपेक्षा जास्त काळ अनुभव येतो. इंटरमिजिएट स्लीपरमध्ये स्त्रियांनी जवळजवळ एक वर्षांपर्यंत हृदयविकारमुक्त आयुष्य गमावले आणि पुरुषांनी किंचित जास्त गमावले. याचा अर्थ असा की, घोरणे आणि झोप न लागणे हे भविष्यातील संभाव्य आरोग्य समस्यांचे धोक्याचे लक्षण असू शकते. स्लीप एपनियासारख्या वैद्यकीयदृष्ट्या निदान झालेल्या आणि झोपेशी संबंधित श्वासोच्छवासाच्या विकारांनी सात वर्षांचे हृदयरोगमुक्त जीवन गमावले.

# महाडचे चवदार तळे प्रेरणादायी क्रांतीभूमी -केंद्रीय राज्यमंत्री आठवले

## सत्याग्रहाच्या वर्धापन दिनी महामानव डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**महाड : प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड चवदारतळे येथे केलेल्या पाण्याच्या सत्याग्रहाला पुढील वर्षी शतक महोत्सवी वर्ष सुरु होणार आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळयाचा सत्याग्रह करुन या देशामध्ये समतेच्या युगाचे रणशिंग पुंकले होते. त्यामुळे चवदार तळे हे जागतिक स्तरावर प्रेरणादायी क्रांतीभूमी आहे.त्या पार्श्वभुमीवर राज्य सरकारने महाड क्रांतीभूमीत २०० एकर जमीन संपादीत करुन महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकार्यावर आधारित भिमसृष्टी निर्माण करावी त्यासाठी आपण राज्यसरकार कडे प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी महाड येथे केले.



महाड चवदार तळाच्या ९८ व्या वर्धापनदिनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी चवदार तळे येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पाहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाद्वारे देशाला सर्वधर्मसमभावाचा ; धर्मनिरपेक्षतचा मार्ग दिलेला आहे. सर्वधर्मसमभाव हीच रिपब्लिकन पक्षाची भूमिका आहे. देशात चालणा–या वेगवेगळया घटनांवर आणि औरंगजेबाच्या कबरीबाबत बोलतांना या देशात छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने मुगलशाही महाराष्ट्राच्या मातीत गाडली आहे. जुन्या वादामध्ये कोणीही पडु नये. औरंगजेबाशी येथिल मुस्लिमांनी नाते कोणी सांगु नये. हिंदु आणि मुस्लिम असा भेदभाव नको. वाद बाजूला सारुन सर्वांनी शांततेने राहिले पाहिजे. छत्रपती संभाजी नगर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक राज्य सरकारने उभारले पाहिजे. अशी मागणी रामदास आठवले यांनी यावेळी केली.

छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम सदैव संस्मरणीय आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम आणि त्यांचे जीवन हे संपूर्ण देशाला प्रेरणादायी आहे. त्या पराक्रमी वीर संभाजी महाराजांचे भव्य प्रमाणात स्मारक छत्रपती संभाजी नगरमध्ये उभारल्यास देशाला येणा–या पिढीला ते प्रेरणादायी ठरेल. राज्य सरकारने छत्रपती संभाजी नगरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारावे अशी मागणी ना.रामदास आठवले यांनी यावेळी केली.

रिपब्लिकन पक्ष हा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला पक्ष असून धर्मनिरपेक्षतेने सर्वधर्मसमभावाच्या भावनेने रिपब्लिकन पक्षाचे काम चालु आहे. चवदार तळयावर महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला पाण्याचा सत्याग्रह हा मानवमुक्तीचा संगर ठरला. समतेच्या लढयाची मुहर्तमेढ रोवणारा चवदार तळयाचा सत्याग्रह आहे. संपूर्ण विश्वात मानवी हक्कांच्या लढयाला प्रेरणा देणारा चवदार तळयाचा सत्याग्रह आहे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळयाचा सत्याग्रह करुन या देशामध्ये समतेच्या युगाचे रणशिंग पुंकले होते. महाडच्या या क्रांतीभूमीत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक भिमसृष्टी म्हणून उभारले पाहिजेअशी देशभरातील आंबेडकरी जनतेची भावना असल्याचे मत या वेळी ना.रामदास आठवले यांनी मांडले.

# रोह्यात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे नगरपरिषदेच्या बाजुला रुपेश हाँटेल समोर दोन दुचाकी एकमेकांना आदळून भीषण अपघात झाला होता. या अपघाता रस्त्यावरील डिव्हायडरला अमोल मोरे हा तरुण आदळल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली . तर त्याला पुढील उपचारासाठी डॉ. जाधव दवाखान्यात नेण्यात आले होते. नंतर तात्काळ मुंबईत उपचारासाठी हलविण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून अमोल मोरे मृत्युशी असलेली कडवी झुंज अपुरी पडत अखेर त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान रुपेश हाटेल समोर एम.एच.०६ सी. जे.६८४६ हि दुचाकी रस्ता क्रॉस करत असताना एम. एच.०६ बि. के. ३००७ या क्रमांकाची गाडी युनिकॉन ही गाडी समोरील गाडीवर जोरदार टक्कर झाली.परंतु युनिकॉन गाडी चालक अमोल मोरे रा. भुवनेश्वर हा तरुण रस्त्याच्या मधोमध असलेल्या डिव्हाडरला आढळुन डोक्याला गंभीर जखमी झाल्याने त्याला चक्कर आली होती तो जागच्या जागीच निपचीत पडला होता त्याच्या नाकातोंडातुन रक्ता वाहत असल्याने जमलेल्या जमावाने त्याला रिक्षात बसवून दवाखान्यात हलविण्यात आले होते, मात्र अखेर त्याचा मृत्य झाला आहे.

## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल

**ताबा सूचना**

**(स्थावर मालमत्तेकरिता)**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियमन, २००२ नुसार)**

ज्याअर्थी,

**मी, श्री. अजय लक्ष्मण कुलकर्णी**, मुख्य कार्यकारी अधिकारी, दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि., बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ९ आणि कलम १३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या दिनांकास मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारा/रांकडे प्रत्येक खात्यासमोर उल्लेखिलेली रक्कम सूचनेच्या दिनांकापासून/ सदर सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत परतावा करण्याची मागणी केली होती.

**कर्जदार सदर रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की,याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमनाच्या** नियम ९ **सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्याच्या समोर उल्लेखिलेल्या दिनांकास ताबा घेतला आहे.**

विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्ते/त्तांबाबत कोणताही व्यवहार हा दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.च्या रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/गहाणवटदार/ जामीनदाराचे नाव (मालमत्तेचे मालक) | गहाणवट मालमत्तेचे वर्णन | मागणी सूचनेचा दिनांक | ताबा सूचना चिटकवण्याचा दिनांक | मागणी सूचनेच्या दिनांकास थकबाकी रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. गोरक्षनाथ जानू पाटील (कर्जदार/गहाणवटदार), श्री. देवीदास सुकऱ्या गायकर (जामीनदार) आणि श्री. नामदेव पांडुरंग पाटील (जामीनदार) | श्री. देवीदास सुकऱ्या गायकर यांच्या नावे असलेली खोली क्र. १३२, गाव धनसार, तालुका पनवेल, जि. रायगड ४१०२०८. क्षेत्रफळ - ४५० चौ.फू. | १२.११.२०२४ | १७.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. २१,२७,२३३/- (रुपये एकवीस लाख सत्तावीस हजार दोनशे तेहेतीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |
| २ | श्री. माणिक रामभाऊ गायकर (कर्जदार/गहाणवटदार), श्री. मधुकर शांताराम काटकरी (जामीनदार) आणि श्री. रमेश जनार्दन गायकर (जामीनदार) | श्री. माणिक रामभाऊ गायकर यांच्या नावे असलेले घर क्र. ९२-ई, करंजडे, तालुका पनवेल, जि. रायगड. क्षेत्रफळ ३८ चौ.मी. | २५.१०.२०२४ | १७.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. २५.१०.२०२४ रोजीनुसार रु. ७,२९,४९०/- (रुपये सात लाख एकोणतीस हजार चारशे नव्वद मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१०.२०२४ पासूनचे व्याज. |
| ३ | श्री. रविंद्र कमलाकर मांडवकर (कर्जदार/गहाणवटदार), श्री. सचिन रमेश मांडवकर (जामीनदार) आणि श्री. कृष्णा विठ्ठल भोईर (जामीनदार) | श्री. रविंद्र कमलाकर मांडवकर यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ३, तळमजला, बी विंग, श्री प्रसन्ना को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सर्व्हे क्र. १०६, हिस्सा क्र. बी-४, गाव काळुंद्रे, तालुका पनवेल, जिल्हा. रायगड. मोजमाप २९.३५ चौ.मी. | २५.१०.२०२४ | १७.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. २५.१०.२०२४ रोजीनुसार रु. ७,७०,६११/- (रुपये सात लाख सत्तर हजार सहाशे अकरा मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.१०.२०२४ पासूनचे व्याज. |
| ४ | मे. कुणाल ट्रान्सपोर्ट, द्वारा त्यांचे प्रोप्रा. सौ. जयश्री भास्कर पाटील (कर्जदार/ गहाणवटदार), सौ. जयश्री भास्कर पाटील, प्रोप्रा. मे. कुणाल ट्रान्सपोर्ट (कर्जदार/गहाणवटदार), श्री. हसन अली मोहम्मद गोलवाला (जामीनदार) श्री. कल्पेश कमलाकर पाटील (जामीनदार) | मे. कुणाल ट्रान्सपोर्ट, द्वारा त्यांचे प्रोप्रा. सौ. जयश्री भास्कर पाटील यांच्या नावे असलेले घर क्र. ६२३, मुक्काम पोष्ट जसई, तालुका उरण, जिल्हा रायगड. क्षेत्रफळ - ५००० चौ.फू. | १२.११.२०२४ | २१.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ३३,३४,२४१/- (रुपये तेहेतीस लाख चौतीस हजार दोनशे एक्केचाळीस मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |
| ५ | श्री. आशिष बाळाराम पाटील (कर्जदार), श्री. अनिल दत्ताराम भोईर (जामीनदार), श्री. बाळाराम कृष्णा पाटील (जामीनदार) | वाहन क्र. MH46BD5550, मॉडेलः फोर्ड एंडेव्हर ३.२ लि. टायटानियम ४, इंजिन क्र.: जेटी २०२५४, चेसिस क्र. MAJAXXMRWAJT20254. | १८.११.२०२४ | २१.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ४१,३०,३०४/- (रुपये एक्केचाळीस लाख तीस हजार तीनशे चार मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |
| ६ | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी (कर्जदार/ गहाणवटदार), सौ. शलाका निवृत्ती कोळी (कर्जदार/गहाणवटदार), श्री. राज एकनाथ कोळी (जामीनदार) श्री. दीपक बंडू कोळी (जामीनदार), श्री. निलेश अरुण खाडे (जामीनदार) | श्री. निवृत्ती लक्ष्मण कोळी आणि सौ. शलाका निवृत्ती कोळी यांच्या नावे असलेले घर क्र. २०९४, गाव गव्हाण, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. क्षेत्रफळ - ८४१ चौ.फू. | १२.११.२०२४ | २१.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. २५,७९,०६७/- (रुपये पंचवीस लाख एकोणऐंशी हजार सदुसष्ट मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |
| ७ | श्री. दिनकर बुधाजी मुंढे (कर्जदार), श्री. फिरोझ सत्तार नाईक (जामीनदार) श्री. मच्छिंद्र अल्या डाकी (जामीनदार) | श्री. दिनकर बुधाजी मुंढे यांच्या नावे असलेले घर क्र. २६०, ओएनजीसी कॉम्प्लेक्स, मधली आळी, गाव कोलखे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड. | १२.११.२०२४ | २१.०३.२०२५ (सांकेतिक) | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ५,६२,०६८/- (रुपये पाच लाख बासष्ट हजार अडुसष्ट मात्र) अधिक त्यावरील दि. ०१.११.२०२४ पासूनचे व्याज. |

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**दिनांकः २१.०३.२०२५**
**ठिकाणः पनवेल**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**


# अलिबाग ते आक्षीसाखर व थेरोंडा समुद्र खाडीपुलांची प्रतीक्षा

## ◆ पर्यटन विकासासह पंचक्रोशींचे आमुलाग्र परिवर्तन निश्चित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग ते रेवदंडा हे अंतर अवघ्या दहा मिनिटावर येईल, त्या अलिबाग ते आक्षी साखर व थेरोंडा समुद्र खाडी या दोन पुलाची प्रतिक्षा व वेध येथील स्थानिकांना लागले आहे. या दोन पुलाच्या निर्मितीने पर्यटन विकासासह पंचक्रोशीचे आमुलाग्र परिवर्तन निश्चित असेल.





ज्या काळात एस.टी. सेवा नव्हती, त्यावेळी रेवदंडाकडून अलिबागकडे जाताना हा मार्ग फारच उपयुक्त होता. थेरोंडा आगलेची वाडी येथील छोटा साकव पुलाचे मार्ग आक्षी साखर येथील तर सेवेने (होंडी सेवा) अलिबागकडे जा–ये होत असे. रेवदंडा येथून पायी चालत अथवा घोडागाडी, बैलगाडी आदीच्या सहाय्याने आक्षी साखर पर्यंत प्रवासीवर्ग प्रवास काही मिनिटात पार करत होते. मात्र एस.टी. सेवा सुरू झाली, आणी अलिबागकडे जाणारा हा मार्ग चौल,आक्षी मार्गे बेलकडे, कुरूड या गावाचे बाजूने हमरस्ता सुरू झाला. रेवदंडा ते अलिबाग एस.टी. प्रवास सुरू झाल्याने कालांतराने आक्षी साखर येथील तर सेवा बंद झाली व सध्याचा रेवदंडा, आक्षी,बेलकडे, कुरूळ हा मार्ग प्रवासीवर्गाने अंगिकारला.

परंतू पुर्वीचा रेवदंडा, आक्षी साखर तर सेवेचा जुना मार्गाने फारच कमी वेळेत अलिबागला पोहचता येईल, या जुन्या मार्गात अलिबाग ते आक्षी साखर व थेरोंडा समुद्र खाडी दोन पुलाची प्रतिक्षा येथील स्थानिकांना आहे. या पुलाच्या निर्मितीने आक्षी, नागाव, चौल व रेवदंडा या ग्रामपंचायत परिसरातील गावे अलिबागला फारच जवळ येणार आहेत. शिवाय यापुलाच्या निर्मितीने अलिबागकडे येत असलेल्या पर्यटक निश्चितपणे वाढ होणार आहे.

तसेच आक्षी, नागाव, चौल व रेवदंडा या ग्रामपंचायत परिसरातील पंचक्रोशीचा आमुलाग्र परिवर्तन निश्चितपणे होईल. शिवाय हा मार्ग अस्तित्वात आल्यास मुरूड तालुका सुध्दा अलिबागला फारच नजीकचा असेल. सध्यस्थितीत अलिबाग व मुरूड पर्यटन क्षेत्र म्हणून विकसीत होत आहे. मुंबई, ठाणा आदी शहराकडून अलिबाग व मुरूड तालुक्यात नेहमीच येणार्या पर्यटकांची वाढ होणार असून मांडवा ते रेवदंडा असा निसर्गरम्य पर्यटन क्षेत्राचा आस्वाद वनडे पिकनिकव्दारे मुंबईकरांना घेता येईल.

थेरोंडा आगलेची वाडी नजीकचा अगदीच छोटा पायपिट व घोडागाडी व बैलगाडी साठी असलेल्या साकव पुलाची फारच दुरावस्था झाली आहे. हा साकव पुल नव्याने बांधण्यात यावा म्हणून येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्याधिकारी आदीच्या दप्तरी निवेदन अर्ज केले आहेत. सन २०१२ साली, हा पुल होण्यासाठी केलेल्या निवेदन अर्जास निधी उपलब्ध झाल्यावर हा पुल होईल असे आश्वासन शासनाने दिले होते,

आक्षी साखर ते अलिबाग समुद्र खाडी मार्ग अगदीच नजीकचा अलिबाग अथवा आक्षी साखर येथून दोन्ही गावे पहाता येतात, एव्हढे निकटवर्गिय ठिकाण असून सुध्दा आक्षी साखर ते अलिबाग या पुलाची निर्मितीकडे कधीही संबधीतानी लक्ष्य दिले नाही, शिवाय स्थानिकांनी सुध्दा या पुलाच्या मागणीचा पाठपुरावा केला नाही असेच म्हणावे लागेल. मात्र आक्षी साखर ते अलिबाग समुद्र खाडी पुलाची निर्मिती केव्हाच होणे गरजेचे होते. परंतू या पुलाच्या निर्मितीची मागणी का झाली नाही, व अलिबाग तालुक्याचा सर्वागिण विकासाला पुरक असा हा पुल अदयापी का झाला नाही, असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

अलिबाग ते आक्षी साखर व थेरोंडा समुद्र खाडी दोन पुलाची निर्मितीने आक्षी, नागाव, चौल व रेवदंडा या ग्रामपंचायत अंतर्गत गावाना अलिबाग अवघ्या काही मिनिटावर येईलच परंतू अलिबाग कडून पर्यटक निश्चितपणे या परिसरात येईल व पर्यटनास वाढ होईल. अलिबाग शहर अगदीच जवळ आल्यास या परिसरात निश्चित आमुलाग्र बदल घडून येईल, हे निश्चित आहे.

# रोह्यात अल्पवयीन मुलीचा विनयभंग, आरोपीवर गुन्हा दाखल

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एका ७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा एक धक्कादायक प्रकार समोर आल्याने तालुक्यातील एकच खळबळ उडाली आहे. आईच्या फिर्यादीनुसार रोहा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार १९ मार्च रोजी दुपारी१च्या सुमारास फिर्यादी यांची मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असून सुद्धा आरोपी सुलतान दाऊद पानसरे रा. सिद्धार्थ नगर याने रास्त धान्य दुकान येथे आधार कार्ड लिंक करण्याच्या कारणाने बोलावून मोबाइल मधील किसिंगच्या अश्लील रिल्स दाखवून हात पकडून छातीला हात लावून विनय भंग केला आहे.

सदर बाब पिडीत मुलगी हिने आपल्या आईला सांगितल्यानंतर पिडीत मुलीची आई आपल्या मुलीला घेऊन आरोपी यास जाब विचारण्यास गेली असता आरोपीने दमदाटी करुन अश्लील शब्दात शिवीगाळ केली. आरोपी हा रेशन दुकानधारक असून त्याच्या विरोधात रोहा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई पायक हे करत आहेत.

**Hiring Audit Staff**
**Fresh/ Experienced Audit staff required for CA firm**
at Hiranandani fortune city, Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada, Panvel
**Contact: 8390407010**

## महाराष्ट्र शासन

**महाड मार्ग प्रकल्प विभाग, महाड (रायगड)**

**Email :- rpddivision@gmail.com Ph. No. (02145) 222243**

**निविदा सूचना क्रमांक १९ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी–१** नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (मा.प्र) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पाचाड येथे प्राधिकरण जागेमध्ये विश्रामगृहाचे बांधकाम करणे, ता. महाड, जि. रायगड. | ४,४३,५६,१६९.००/– | २,२२,०००,००/– | ३५४०/– | १२ महिने | खुला |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२४/०३/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०१/०४/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण यांचे कार्यालयात दि. **२८.०३.२०२५** रोजी वेळ. १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०३/०४/२०२५** वेळ ११.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ १८२**
**दिनांक : १९/०३/२०२५**

**सही/**
**श्रीमती सलोनी स. निकम**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (मा.प्र) विभाग, महाड**

## म्हसळ्यातील संदेरीमध्ये अल्पवयीन मुलीवर बलात्कार; आरोपी अटकेत

**म्हसळा : प्रतिनिधी**

गोरेगाव येथील पोलीस ठाणे हद्दीत १७ मार्च रोजी संदेरी (ता. म्हसळा) गावचे हद्दित आरोपी याचे राहते घरी आरोपीने अल्पवयीन पिडीत बालिकेला चॉकलेट देण्याचे बहाण्याने त्याचे राहते घरामध्ये बोलावुन तिचे सोबत जबरी संभोग केला. सदर गुन्ह्यातील आरोपीस २० मार्च रोजी अटक करण्यात आली आहे. याबाबत गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाअसून अधिक तपास सपोनि विजय सुर्वे करीत आहेत.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

**जाहीर नोटीस**

या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे ग्राहक श्री. जगदीश संभाजी परब आणि श्रीमती सोनाली जगदीश परब, हे दोघे फ्लॅट नं. ए-१०२, रिलॅक्स रेसीडेन्सी, हाउस नं. ११८१ बी आणि सी, सेक्टर - ३५ डी, ओवे - खुटूकबांधण, खारघर - ४१०२१० या फ्लॅटचे सध्या मालक आणि निवासी आहेत. यांनी हा फ्लॅट रिलॅक्स डेव्हलपर्स यांच्याकडून ॲग्रीमेंट फॉर सेलनुसार दिनांक १७/०३/२०१७ रोजी खरेदी केला आहे.

तसेच श्री. संभाजी रामचंद्र परब हे वरील नमूद केलेल्या फ्लॅटचे सह-मालक होते व रिलॅक्स रेसीडेन्सी सी.एच.एस. चे सदस्य असून त्यांचा दिनांक २५/०२/२०२४ रोजी एस. एस.पी.एम मेडीकल कॉलेज ॲण्ड लाईफटाईम हॉस्पिटल, पाडवे येथे मृत्यु झाला आहे.

जर कोणाचेही काही गहाणखत, न्यायालयीन बाबी अथवा कोणतेही वारस हक्क असल्यास सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेदरम्यान आमच्या कार्यालयाला प्रत्यक्ष भेट द्या. जर यापैकी कोणत्याही प्रकारचे दावे असतील तर योग्य त्या प्रकारची कागदपत्रे जमा करा. हे या सार्वजनिक पेपर नोटीसच्या १५ दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार व दाव्यांचे उत्तर दिले जाणार नाही.

दिनांक : २१/०३/२०२५.

सही/–
ॲड आदित्य कटकदौंड

Kharghar Cha Raja Ganesh Temple (Basement), Sector 12, Kharghar, Navi Mumbai 410 210, mob :- 9594962207

**जाहिर नोटीस**

याद्वारे जाहिर नोटीस देण्यांत येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्टयाने प्रदान करणेंत आलेल्या शासकीय भूखंडाबाबत वारसनोंद / नुतीनकरण / हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ या करीता श्री. संकेत नागेश कांबळे, रा. माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशिल**

| गावाचे नाव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटीएस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान ता. कर्जत | बाजार भुखंड ५१ | ३२२ | १२१.९ चौ.मी. | शांताबाई दत्तात्रय कांबळे | ३१/०७/१९८६ |

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद / नुतनीकरण/ हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ. बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधिक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड यांजकडे आवश्यक कागदपत्रे / पुरावे यांसह लेखी स्वरुपात सादर करणेंत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

**स्थळ :– माथेरान ता. कर्जत**
**दिनांक :– २१/०३/२०२५**

**सही/–**
**अधिक्षक माथेरान**
**ता. कर्जत, जि. रायगड**

# महिला सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध

## वनमंत्री गणेश नाईक यांचे प्रतिपादन





**नवी मुंबई : बातमीदार**

पतीच्या खांद्याला खांदा लावून आपल्या संसाराचा गाडा ओढत असताना सक्षम नसलेल्या महिला भगिनींना, राजकीय, सामजिक आणि आर्थिक बळ देवून त्यांना खऱ्या अर्थाने समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी नवी मुंबईत केले.

महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविम) यशस्वी ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल माविम सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून आज नवी मुंबईतील वाशी सिडको प्रदर्शन केंद्र येथे झालेल्या माविम सुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. दि. २० ते २५ मार्च या कालावधीत ग्रामीण भागातील बचतगटांनी तयार केलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, गृहउपयोगी साधन सामग्री असलेल्या जिल्हास्तरीय माविम सुवर्ण महोत्सव- नव तेजस्विनी २०२५ प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते झाले. सुरुवातीस नाईक यांनी प्रदर्शनाची पाहणी केली व स्टॉलला भेटी देवून स्टॉलमध्ये विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या वस्तू व पदार्थांची माहिती घेतली.

या सोहळ्याप्रसंगी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रशांत ठाकूर, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, महिला व बालविकास विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा-उंटवाल, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आव्हाडे, इफाड च्या राष्ट्रीय समन्वयक मीरा मिश्रा, शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी तसेच महाराष्ट्राच्या विविध ठिकाणांहून आलेल्या बचतगटांच्या महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीप प्रज्वलनाने या उद्घाटन सोहळ्याचा शुभारंभ झाला.

वनमंत्री गणेश नाईक हे उपस्थित सर्व महिलांना माविम च्या सुवर्णमोहोत्सवी दिनाच्या शुभेच्छा देत म्हणाले की, आदिती तटकरे आणि मेघना साकोरे-बोर्डीकर या दोन महिला मंत्र्यांच्या नेतृत्वाने माविम च्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी वर्षाला उत्तम गती मिळेल.

नाईक पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी महिलांना सक्षम करण्याची फक्त इच्छाच व्यक्त केली नाही, तर त्यानुषंगाने दमदार पावलेदेखील उचलली आहेत. महिलांना पाण्यासाठी वणवण फिरायला लागू नये, यासाठी जलजीवन मिशन युध्दपातळीवर राबविण्यात आले. अन्न, वस्त्र, निवारा आणि महिलांचा सन्मान यानुषंगाने पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांची भूमिका सकारात्मक आहे. महाराष्ट्र राज्यात जेव्हा महिलांच्या विकासासाठी काही अपेक्षा केली तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह सर्व मंत्रीमंडळाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. जोपर्यंत महिला सक्षम होत नाही तोपर्यंत कुटुंब सक्षम होत नाही, असे म्हणत येणाऱ्या कालखंडात महिला अधिक सक्षम होतील, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माविमचा सुवर्ण महोत्सव आपण आज साजरा करू शकलो कारण माविमच्या प्रत्येक घटकाने माविमच्या यशासाठी मोलाचा वाटा उचलला आहे. खऱ्या अर्थाने सगळ्यांचे कष्ट आणि माविमला प्रतिसाद देणारी प्रत्येक महिला ही आजच्या या सोहळ्याची तितकीच समान मानकरी आहे, जितकी या विभागाची प्रतिनिधी म्हणून मी आहे. माविमला यशस्वी करण्यासाठी खूप कठीण प्रसंगांचा सामना करावा लागला आणि आज माविम मधे २० लाखांहून अधिक महिला साहभागी झाल्या आहेत. माविमला केवळ राज्य अन् राष्ट्रीय स्तरावरच नाही तर थेट आंतरराष्ट्रीय स्तरावरही सन्मानित करण्यात आले आहे. सगळ्या बचतगटांच्या चळवळीत माविमच आयडियल मॉडेल आहे. कारण माविम कोणावरही अवलंबून न राहता महिलांना कर्ज देते. माविमच्या महिला बचतगटांचा कर्ज परतफेडीचा दर ९९.०५ टक्के आहे. याचा मला अभिमान आहे, असे सांगून आदिती तटकरे यांनी माविमच्या महिलांचे अभिनंदन केले.

त्या पुढे म्हणाल्या की, आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्ताव ठेवला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांवर प्रत्येक ३५ ते ५० किलोमीटरच्या अंतरावर महिलांसाठी स्वच्छ सुंदर शौचालये बांधण्यात यावे आणि त्या शौचालयाच्या जवळपास स्टॉल उपलब्ध करून दिल्यास माविमच्या माध्यमातून त्या स्टॉलवर होणाऱ्या उत्पादनांच्या विक्रीतून शौचालयांच्या देखभालीचा खर्च भागविला जावू शकतो. तसेच महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून उमेद प्रमाणे तालुक्याच्या प्रत्येक नगरपंचायतीच्या बाजारपेठेच्या ठिकाणी माविमचे स्वतंत्र अस्मिता भवन उभारण्यात येईल. असा प्रस्तावच शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

या अस्मिता भवनात माविमच्या महिलांची उत्पादने, विक्रीसाठी स्टॉल, माविमची कार्यालये, प्रशिक्षण केंद्र असणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी माविमच्या विस्ताराची मागणी मान्य केली असून, माविम मधील महिलांची संख्या २० लाखांहून किमान ५० लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट आम्ही या सुवर्ण महोत्सवी दिवशी ठरविले आहे.

राज्यमंत्री महिला व बालविकास मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी नुकत्याच अंतराळात नऊ महिने राहून पृथ्वीवर परतलेल्या सुनिता विल्यम्स यांचा दाखला देत स्त्रीशक्तीच्या इच्छाशक्ती आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले. माविमच्या महिलांचे कष्ट आणि त्यांच्या यशकथा पाहून मला अभिमान वाटतो, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी माविम च्या माध्यमातून उद्योगक्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या रमा कांबळे, स्वाती विठ्ठल शेळके, वैशाली वसंत पाटील, रोहिणी भानुदास कुसमागडे, शशिकला नारायण डांगे, मंजुताई राजेंद्र ठाकरे, संगिता कोळी या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी माविमच्य महिला बचतगटांच्या यशकथा तसेच त्यांची उत्पादने याची माहिती असणाऱ्या एकूण ३ कॅटलॉगचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकपर भाषणात महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी माविम बद्दल सविस्तर माहिती दिली.

# राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची सांगता

## टीटीसी औद्योगिक क्षेत्रात सुरक्षा सप्ताहाचे आयोजन



**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे-बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन (टीबीआयए ) आणि म्युच्युअल ऍण्ड रिस्पॉन्स ग्रुप यांच्या सहयोगाने आयोजित राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची सोमवारी यशस्वी सांगता झाली. या सप्ताहानिमित्त टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील विविध उद्योगांसाठी सुरक्षा जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात आले.

या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहा दरम्यान, टीटीसी औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा चित्रकला व रेखाचित्र स्पर्धा, औद्योगिक सुरक्षा रॅली, फायर ड्रील स्पर्धा, महिला दिन उत्सव, सुरक्षा प्रश्नमंजूषा स्पर्धा, नाटिका आणि गाण्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर सर्वोत्तम सुरक्षा पध्दतीचे सादरीकरण व कॉज मॅपिंग-अपघात तपासणी केस स्टडीसह याविषयावर सुरक्षा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या सुरक्षा सफ्ताहाच्या समारोपप्रसंगी आयोजित कार्यक्रमात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे सहसंचालक विलास घोगरे यांनी औद्योगिक ठिकाणी सक्रीय सुरक्षा संस्कृती वाढवण्याच्या गरजेवरती भर दिला. तसेच टीटीसी औद्योगिक क्षेत्रात होणारे अपघात टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, सुरक्षा नियमांचे पालन आणि उद्योग क्षेत्रातील सर्व भागधारकांचे सक्रिय योगदान महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

यावर्षीच्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह अंतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रमांमुळे औद्योगिक क्षेत्रात जनजागृतीचे प्रमाण वाढले गेले. तसेच सर्वोत्तम सुरक्षा पध्दतींना प्रोत्साहन मिळाल्याचे सांगत हा उपक्रम महाराष्ट्राच्य औद्योगिक क्षेत्रात सुरक्षितता वाढवण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरल्याचे विलास घोगरे यावेळी म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षा सफ्ताहाच्या यशस्वी आयोजनाकरिता डीआयएसएचचे उपसंचालक प्रवीण पाटील व अविनाश मडावी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# तुर्भे येथे शास्त्रोक्त घनकचरा व्यवस्थापन



**नवी मुंबई : बातमीदार**

**प्रकल्पस्थळ अत्याधुनिक करण्यासाठी आयुक्त डॉ. शिंदे यांच्याकडून पाहणी**

घनकचरा व्यवस्थापन प्रणालीमध्ये प्रक्रिया प्रकल्प स्थळ अत्यंत महत्वाचे असून नवी मुंबई महानगरपालिकेचा तुर्भे एमआयडीसी येथे असलेला शास्त्रोक्त भूभरणा पध्दतीवर आधारित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प देशातील उत्तम प्रकल्पांपैकी मानला जातो. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ परीक्षणास सुरुवात झाली असून त्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प स्थळाची बारकाईने पाहणी केली.

स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचा समावेश सुपर स्वच्छ लीगमध्ये झालेला असून नवी मुंबईचे मानांकन उंचाविण्यासाठी लोकसहभागातून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळावरील प्रक्रिया ही महत्वाची असून त्यादृष्टीने आयुक्तांनी प्रकल्पस्थळावरील अंतर्गत स्वच्छतेवर अधिक भर देण्याचे निर्देश दिले. तेथे मोकळ्या जागांवर काही ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले असून आणखी मोकळया जागा शोधून तेथेही वृक्षारोपण करण्याच्या सूचना आयुक्तांमार्फत देण्यात आल्या. या ठिकाणी वृक्षारोपण करताना आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली जैवविविधतेला पूरक अशा देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली असून त्यामध्येही बांबूची मोठया प्रमाणावर लागवड करण्यात आलेली आहे. त्या जागेची पाहणी करून आयुक्तांनी समाधान व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात दररोज साधारणत: ७५० मेट्रीक टन कचरा निर्माण होत असून तो तुर्भे येथील महानगरपालिकेच्या शास्त्रोक्त भूभरणा पध्दतीवर आधारित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी आणण्यात येउन त्यावर प्रक्रीया करण्यात येते. त्यामधील ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती केली जाते तसेच सुक्या कचऱ्यापासून आरडीएफ बनवून रासायनिक उद्योग, सिमेंट उद्योग, थर्मल पॉवर स्टेशनला दिले जाते.

त्याचप्रमाणे यामधील नारळाच्या रिकाम्या शहाळ्यांपासून कोकोपीट वेगळे काढले जाते. त्याच उपयोग नर्सरी व फुलबागा याठिकाणी होतो. तसेच त्यामधील फायबर वेगळे काढले जाउन त्याचाही उपयोग गादीच्या कुशनमध्ये व मूर्ती बनविण्यासाठी केला जातो. त्यासोबतच काथ्याची निर्मितीही करण्यात येते. याशिवाय एमआरएफ रिसायकलींग इंडस्ट्रीला पाठविले जाते.

आपल्या शहरातील घनकचऱ्यावर कशा पध्दतीने शास्त्रोक्त प्रक्रिया होते याची नागरिकांना विशेषत्वाने लहान मुलांना माहिती व्हावी या दृष्टीने शालेय विदयार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी आणून त्यांना अभ्यासाच्या दृष्टीने माहिती करुन दयावी अशाही सूचना आयुक्तांमार्फत करण्यात आल्या.

या ठिकाणी असलेले बांधकाम व पाडकाम घनकचरा प्रक्रिया स्थळ अधिक उत्तम व सक्षम करण्यासाठी सुरु असलेली कार्यवाही जलद करावी तसेच यामध्ये सामाजिक सहभागाचा अंतर्भाव करावा. सोबतच निर्माण होणारे बांधकाम साहित्य मनपाकामांमध्ये कंत्राटदारांनी वापरावे यादृष्टीने नियमावली करावी, अशाही सूचना आयुक्तांनी दिल्या.

# श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन

**उरण : वार्ताहर**



उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघ आनंद नगर यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा सोमवार (दि. ३१) मार्च रोजी साजरा करण्यात येणार आहे, असे श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघचे अध्यक्ष शेखर म्हात्रे यांनी सांगितले.

या दिवशी सकाळी ८ वाजता स्वामींचे अभिषेक ,आरती करण्यात येईल. सकाळी ८.३० वाजता हनुमान चालीसा, १०.३० वाजता आरती, ज्येष्ठ नागरिक भजन मंडळ सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत, संध्याकाळी ६.३० वाजता आरती, सकाळी ६ ते रात्रो १० वाजेपर्यंत श्री स्वामी समर्थ समाजमंदिर दर्शनासाठी खुले (उघडे) राहील. दिवसभर शिरा प्रसाद भक्तांना दिला जाईल.

श्री स्वामी समर्थ प्रकट दिननिमित्त २४ मार्च ते ३० मार्चपर्यंत सकाळी ९ वाजता गुरु चरित्र पारायण केले जाईल. भक्तांनी पारायणाचा, सेवेचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी सांगितले आहे.

# बेवारस १०७ वाहनांवर धडक कारवाई

## ८८ हजार दंडात्मक शुल्क वसुली





**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील स्वच्छतेला बाधा पोहचविणाऱ्या बेवारस वाहनांविरुध्द महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागामार्फत विशेष मोहीम हाती घेउन १० ते १६ मार्च २०२५ या आठवड्याभराच्या कालावधीत ६६ दुचाकी व ३४ चारचाकी आणि ७ रिक्षा / टेम्पो अशी १०७ विविध प्रकारची बेवारस वाहने उचलून घेण्यात आली आहेत. या मोहीमेबद्दल नागरिकांकडून मोठया प्रमाणावर समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

नवी मुंबई शहरात अनेक ठिकाणी बऱ्याच दिवसांपासून रस्त्याच्या कडेला तसेच पदपथावर वाहने उभी असल्याने त्याठिकाणी रस्ते व पदपथ सफाई करणे शक्य होत नाही. काही वाहने तर अनेक दिवसांपासून उभी असल्याने त्यावर धुळीचे लोट चढलेले दिसून येतात. या वाहनांचे मालक, चालक यांच्याकडून त्यांची निगा राखली जात नसल्याचे तसेच दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. मात्र यामुळे सुनियोजित व स्वच्छ शहर असा लौकिक असणाऱ्या नवी मुंबई शहर स्वच्छतेला बाधा पोहचत असल्याचे दिसून येते.

याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आढावा बैठकीत अशा बेवारस वाहनांवर कारवाईचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त श्री भागवत डोईफोडे यांच्या मार्फत आठही विभाग कार्यालयाच्या सहा. आयुक्त यांना बेवारस वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्याचे सूचित करण्यात आले होते.

यानुसार विभाग कार्यालयामार्फत आपापल्या क्षेत्रात रस्त्यांवर, पदपथांवर उभ्या असलेल्या बेवारस वाहनांचे सर्वेक्षण करण्यात आले व त्या परिसरामध्ये सदर बेवारस वाहने ज्यांची आहेत त्यांनी घेउन जावीत असे आवाहन करण्यात आले. त्यानंतरही उभ्या असलेल्या बेवारस वाहनांवर नोटीसा चिटकविण्यात आल्या. या नोटीसांनाही प्रतिसाद न देणा-या वाहनांवर धडक कारवाई करीत ही वाहने टोईंगव्दारे उचलून कोपरखैरणे से.१४ येथे नेण्यात आली.

या कारवाईमध्ये बेलापूर विभागात १२ दुचाकी व १ चारचाकी वाहन उचलण्यात आले व रु.४५००/- इतके दंडात्मक शुल्क वसुल करण्यात आले. नेरुळ विभागात ६ चार चाकी वाहने व १ रिक्षा / टेम्पो उचलून रु.६०००/- दंड वसूल करण्यात आला. वाशी विभागामध्ये १७ दुचाकी वाहने व १ रिक्षा / टेम्पो उचलून नेउुन रु.६०००/- दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आले. तुर्भे विभागामध्ये बेवारस पडलेली २ दुचाकी, १२ चारचाकी व २ रिक्षा / टेम्पो अशी एकूण १७ वाहने उचलून घेत रु.६३०००/- इतकी दंडात्मक रक्कमही वसूल करण्यात आली.

कोपरखैरणे विभागातून १७ दुचाकी, ६ चारचाकी व १ रिक्षा / टेम्पो उचलून नेत रु.१०००/- दंड वसूल करण्यात आला. घणसोली विभागात ८ दुचाकी व ४ चारचाकी अशी १२ वाहने उचलून नेत रु.४५००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. ऐरोली विभागातुनही १० दुचाकी, ५ चारचाकी व २ रिक्षा / टेम्पो उचलून घेउुन रु.३०००/- दंडात्मक रक्कम वसूली करण्यात आली. दिघा विभागात ८ दुचाकी, ४ चारचाकी व १ रिक्षा / टेम्पो बेवारस पडलेले आढळल्याने उचलून नेण्यात आले.

कोपरखैरणे येथे उचलून नेण्यात आलेली सर्व १०७ वाहने यांच्यावर नोटीसा चिटकविण्यात आल्या होत्या. कोपरखैरणे येथे वाहने जमा केल्यानंतर ती सोडविण्यासाठी आलेल्या वाहन मालकांकडून त्या वाहनाची कागदपत्रे तपासून व रितसर दंडात्मक शुल्क आकारुन ते वाहन संबधितांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# वृक्ष छाटणी अर्ज धूळ खात पडून

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एखाद्या विकास कामात अडथळा ठरत असलेल्या झाडांच्या बाबतीत ती झाडे तोडणे,स्थलांतर करणे बाबत नियमानुसार महापालिका उद्यान विभागाकडे परवानगी मिळावी म्हूणन अर्ज केला जातो. मात्र अशा परवानग्या देण्यास उद्यान विभाग दिरंगाई करत असल्याने त्याचा विकास कामांना फटका बसत आहे.

विकास कामात अडथळा ठरत असलेल्या झाडांना महाराष्ट्र नागरी क्षेत्र जतन झाडांचे अधिनियम १९७५ नुसार रीतसर परवानगी दिली जाते. या आधी अशी परवानगी देण्यासाठी ६० दिवसांचा कालावधी होता. मात्र २०२१ मध्ये यात सुधारणा करून तो ४५ दिवसांचा कालावधी करण्यात आला आहे. या आधी अशा परवानग्या मुख्यालय स्तरावुन उद्यान उपायुक्त यांच्या अखत्यारीत दिल्या जायच्या. अर्ज केल्यानंतर परवानगी दिड महिन्यात होणे अपेक्षित आहे अशा परवानग्यांना चार ते पाच महिने कालावधी लावला जात आहे

# अंबानी हॉस्पिटलमध्ये दुर्मिळ विकाराने ग्रस्त ११ महिन्यांच्या बाळावर यशस्वी उपचार

**पनवेल : प्रतिनिधी**

कॉक्लियर इम्प्लान्टबॅरेटसर विंटर सिंड्रोम हा एक दुर्मिळ विकार आहे, जगभरात याच्या १०० हुन कमी केसेस नोंदवल्या गेल्या आहेत.सेन्सरीन्यूरल बहिरेपण हे बॅरेटसर विंटर सिंड्रोमचे एक विशेष लक्षण असते आणि कॉक्लियर इम्प्लान्टमुळे यावर उपचार करुन ११ महिन्यांच्या बाळावर बायलॅटरल कॉक्लियर इम्प्लान्ट यशस्वीपणे करून पीडियाट्रिक ईएनटी देखभालीमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलने पार केला

या बाळाला बॅरेटसर विंटर सेरिब्रोफ्रंटोफेशियल सिंड्रोम झालेला होता. हा एक दुर्मिळ आनुवंशिक विकार आहे, सिंड्रोमच्या न्यूरॉलॉजिकल आणि शारीरिक लक्षणांमध्ये हृदय दोष, मेंदूमध्ये असामान्यत्व, सेन्सरीन्यूरल बहिरेपण आणि इतर विसंगतींचा समावेश असतो.

कॉक्लियर इम्प्लान्टसह प्रारंभिक उपचार लहान मुलांमध्ये बोलण्याच्या आणि ऐकण्याच्या क्षमतेचा विकास आणि एकंदरीत जीवन गुणवत्ता वाढवतात. बॅरेटसर विंटर सिंड्रोमसारखा दुर्मिळ विकार असलेल्या बाळासाठी कमी वयामध्ये ऐकण्याची क्षमता पुन्हा मिळवून दिल्याने बोलण्याच्या क्षमतेचा आणि कम्युनिकेशनचा विकास वेळीच होण्यात मदत मिळते.



कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईचे कन्सल्टिंग ईएनटी सर्जन आणि ओटोऱ्हीनोलैरिंजोलॉजिस्ट डॉ वरुण दवे यांनी सांगितले, बॅरेटसर विंटर सेरिब्रोफ्रंटोफेशियल सिंड्रोम एक दुर्मिळ आणि गुंतागुंतीची स्थिती आहे. चेहऱ्याची विकृती, विकासामध्ये विलंब, फिट येणे आणि इतर सिस्टमिक गुंतागुंत ही याची लक्षणे आहेत. त्यासोबतच इतर अनेक न्यूरॉलॉजिकल व शारीरिक विसंगती असतात, त्यामुळे सर्जिकल आणि ऍनेस्थेटिक प्रक्रियांमध्ये अडचणी वाढतात.

सर्जरी योजनेनुसार पार पडली आणि प्रक्रियेदरम्यान कॉक्लियर इम्प्लान्ट कार्यक्षम असल्याची खात्री करण्यात आली. बाळाची तब्येत वेगाने सुधारली आणि सर्जरीनंतर २४ तासांहून कमी वेळात त्याला घरी पाठवण्यात आले. वेगाने झालेली रिकव्हरी हॉस्पिटलचे कुशल देखभाल प्रोटोकॉल आणि संपूर्ण मेडिकल टीमच्या बांधिलकीचा परिणाम आहे. बाळाला हॉस्पिटलमधून लवकर घरी पाठवून दिल्याने कुटुंबावरील तणाव कमी झाला आणि बाळाला त्याच्यासाठी आरामदायक वातावरणामध्ये बरे होण्याची संधी मिळाली.

अंबानी हॉस्पिटलचे डॉ शशिकांत पवार यांनी सांगितले, ऐकण्याची क्षमता प्रत्येक मुलाकडे असलीच पाहिजे. ही केस रुग्णकेंद्रित देखभाल प्रदान करण्याप्रती आमची बांधिलकी दर्शवते, आमची ही बांधिलकी सर्वात आव्हानात्मक परिस्थिती हाताळण्यामध्ये उपयुक्त ठरली आहे.

# अलिबागकरांना मिळणार दुमजली मासळी बाजार

## जूनअखेरीस पूर्ण होण्याची अपेक्षा / विक्रेत्यांची गैरसोय होणार दूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील पीएनपीनगरच्या मागील बाजूस सुरू असलेल्या मासळी मार्केटचे काम काही महिन्यांपासून रखडले होते, परंतु आता कामाला गती आली असून दुमजली इमारत लवकरच पूर्ण होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे कोळी महिलांना मासळी विक्रीस हक्काची व स्वच्छ जागा उपलब्ध होईल.

पीएनपीनगर येथील मासळी मार्केटची इमारती जुनी व मोडकळीस आली होती. या ठिकाणी जागा अपुरी पडत असल्याने कोळी महिलांना रस्त्याच्या कडेला बसून मासळी विक्री करावी लागते. त्यामुळे परिसरात गर्दी व अस्वच्छता पसरते. आता नवीन दुमजली इमारत बांधण्यात येणार आहे. या इमारतीत जास्तीत जास्त विक्रेत्यांना बसण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्त्यावर गर्दी, वाहतूक कोंडी कमी होईल. इमारतीचे काम फेब्रुवारी २०२४मध्ये सुरू होणे अपेक्षित होते, मात्र त्यानंतर पावसाळा आणि निवडणूक आचारसंहिता, तर काही मासळी विक्रेत्यांनी केलेल्या विरोधामुळे इमारतीचे काम रखडले होते. आता स्थानिकांचा विरोध मावळल्यानंतर इमारतीचे काम सुरू करण्यात आले आहे. यासाठी जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.



### कचऱ्यासाठी ओडब्ल्यूसी मशीन

*मच्छी मार्केटमध्ये तयार होणाऱ्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यात येणार आहे. यासाठी ओडब्ल्यूसी (ऑरगॅनिक वेस्ट) मशीन घेण्यात येणार आहे. यामुळे हा कचरा टाकण्याचा अथवा त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. मासळीविक्री करणाऱ्या महिलांसह खरेदी करण्यासाठी येणाऱ्यांसाठी स्वच्छतागृह बांधण्यात येणार आहे. तसेच ड्रेनेजची व्यवस्था असेल. त्यामुळे मासळी धुतल्यानंतर ते पाणी रस्त्यावर टाकण्याची वेळ येणार नाही.*

**या ठिकाणी उभारण्यात येणारी इमारत सर्वसमावेशक असून सर्व विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. जवळपास एक कोटी रुपये खर्च अपेक्षित असून जूनअखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे स्वच्छता राखण्यासाठी तरतूद केली आहे.**

**–सचिन बच्छाव**, मुख्याधिकारी

**मासळी मार्केट इमारतीचे काम फेब्रुवारी २०२४मध्ये सुरू होणे अपेक्षित होते. काही कारणांमुळे काम रखडले. आता कामाला गती आली असून जूनअखेरपर्यंत पूर्ण होईल, असा अंदाज आहे.**

**–संतोष मुंढे,** नगर अभियंता, अलिबाग

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत रायगडात १०० टक्के उद्दिष्टपूर्ती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक–युवतींना स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरू करण्याकरिता असलेल्या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्हा उद्योग केंद्र, रायगडकरिता प्राप्त ६०० प्रकरण उदिष्टांची जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देशन व मार्गदर्शनाने १०० टक्के पूर्तता केली आहे. तशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी दिली.

रायगड जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., इ. अलिबाग या सार्वजनिक व सरकारी बँकानी त्यांना दिलेले उद्दीष्ट विहित वेळेत पूर्ण केले. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राची उद्दीष्टपूर्ती पूर्ण झालेली आहे.

याबद्दल जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्वांचे अभिनंदन केले असून भविष्यातदेखील रायगड जिल्हा आघाडीवर ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

दरम्यान, सुशिक्षित बेरोजगारांनी स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्याकरिता राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेत जिल्ह्यातील सर्व बँकाचा सकारात्मक दृष्टीकोन आहे. या सर्व योजनांचा लाभ जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक–युवतीने घ्यावा, असे आवाहन श्री. हरळय्या यांनी केले आहे.

# चिलठण ग्रामपंचायत हद्दीत फटाके फोडण्यावर बंदी

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चिलठण यांनी ऐतिहासिक निर्णय घेऊन फटाके फोडण्यावर बंदी घातली आहे. विशेष म्हणजे हा निर्णय सर्वप्रथम ग्रामस्थानी घेतला.

सद्या माझी वसुंधरा अभियान ५.० सुरू आहे. या अभियानाची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपत आली असली तरी भविष्यात पर्यावरण संतुलन राखण्यासाठी लागणारी जनजागृती करण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत चिलठण वेगवेगळे उपक्रम राबवीत आले. त्याचाच एक भाग म्हणून यापुढे ग्रामपंचायत हद्दीत होणारे सण, लग्न, विविध सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणूक, निवडणूक आणि दिवाळी या आनंदाच्या कार्यक्रमात प्रदूषण निर्माण करणाऱ्या फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली आहे.

विशेष म्हणजे या ग्रामपंचायत हद्दीत चिलठण आणि उसरोली ही दोन्ही गावे येतात. या दोन्ही गावांनी हा निर्णय गाव बैठकीत घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामपंचायतीला कळविल्यावर ग्रामपंचायतीच्याही बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे यापुढे ही ग्रामपंचायत प्रदूषणमुक्तीच्या मार्गावर असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी मनाली म्हसे यांनी सांगितले.

# पोलादपूर येथे प्रश्नमंजुषा स्पर्धेचे बक्षीस वितरण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुका रहिवासी शिक्षक संघाने आयोजित केलेल्या मिशन १०० राजपत्रित अधिकारी या उद्दिष्टांतर्गत तोंडी प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि बक्षीस वितरण पोलादपूर शाळा क्रमांक १ येथे झाले. शिक्षकांनी आयोजित केलेली यू ट्यूब लाईव्ह भव्य स्पर्धा पोलादपूरकरांच्या कौतुकाचा विषय झाली आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

पोलादपूर तालुक्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांसाठी बौध्दीक तयारी करणे आणि राजपत्रित अधिकारी तयार करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असून या स्पर्धेचे उदघाटन बांधकाम व्यावसायिक रामदास कळंबे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गुलाबराव सोनावणे होते.



स्पर्धेत मराठी, गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान, नागरिकशास्त्र आणि विज्ञान या विषयांवर आधारित प्रश्न विचारण्यात आले. याप्रसंगी अमोल मोरे, सचिन चौधरी, लक्ष्मण आखाडे, नारायण कुंडले यांनी गुणलेखक तर अजय येरुणकर, विकास पवार, संतोष जाधव यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून स्पर्धेत उत्कंठा वाढविली. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे तसेच आत्मविश्वासाने प्रश्नांची उत्तरे दिली. स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांना रोख रक्कम, चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. य

सोबत लेखी परीक्षेतून सुपर टॉप २०मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, चषक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यासोबतच काही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. यावेळी स्पर्धेसाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षकांना सन्मानित करण्यात आले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रश्नमंजुषा समिती अध्यक्ष अनंत गोळे, समीर सालेकर, विकास मांढरे, सचिन दरेकर, संतोष शेलार, संदीप सकपाळ, सचिन सालेकर, राजू पार्टे यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज सकपाळ यांनी, तर सूत्रसंचालन पांडुरंग मोरे यांनी केले.

# अलिबागचा व्योम भगत आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये पहिला

**अलिबाग : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील कोळीवाडा मेटपाडा येथील व्योम मिताली केतन भगतने आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित एसओएफ इंटरनॅशनल ऑलिम्पियाड लेव्हल–२ गणित परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र–गोवा झोनमध्ये प्रथम क्रमांक पटकावत त्याने ६०पैकी ५९ गुण मिळवले तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर २५वा क्रमांक मिळवत आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल एसओएफ इंटरनॅशनल ऑलिम्पियाडतर्फे त्याला रोख पारितोषिक रुपये पाच हजार व महाराष्ट्र–गोवा झोनल गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

व्योम सध्या पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या होली चाईल्ड सीबीएसई स्कूल वेश्वी–अलिबाग येथे इयत्ता पाचवीमध्ये शिक्षण घेत आहे. त्याने याआधीही विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

याशिवाय व्योमने हिंदुस्तान टाईम्स प्रायोजित सतिश अकॅडमी वेदिक मॅथस ॲन्ड अबॅकस टीचर ट्रेनिंग संस्थेतर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत महाराष्ट्र राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीबद्दल संबंधित संस्थेतर्फे त्याला गोल्ड मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

व्योमच्या या यशाबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्याकडून भविष्यात आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भिक्खू संघ व महिला भाविकांचा स्नेहमेळावा

**रोहे : प्रतिनिधी**

दि बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्द महासभा या राष्ट्रिय धम्म संस्थेच्या तालुका शाखा रोहाच्या वतीने ९ ते १८ मार्चपर्यंत उपासिका धम्म प्रशिक्षण शिबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर अष्टमी येथे आयोजित करण्यात आले होते. त्याची सांगता करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे महाड क्रांती भूमी येथे श्रामणेर, बौध्दचार्य शिबिरातील भिक्खू संघाचे सागंडे मुक्कामी भोजनदान हे दिवंगत बौध्दचार्य मारुती शिंदे यांची पत्नी सुनंदा शिंदे, पुत्र व रोहा तालुका सरचिटणीस दीपक शिंदे व त्यांचे बंधू नितेश शिंदे यांनी दिले.

रायगड जिल्हा माझी सरचिटणीस शांतीशिल तांबे व मुकेश तांबे यांनी संघाला व उपस्थितांना अल्पोहार दिला व कांडणे ग्रामशाखेच्या वतीने संघाला व उपस्थितांना फलाहार देण्यात आला. पवित्र भिक्खू संघाची मंगलमैत्रीय रॅली रोहा नगर परिषद कार्यालय ते तीनबत्ती नाका ते भाटे वाचनालयापर्यंत शुभ्र वस्त्रात उपासक व उपासिकांनी शांतता व मंगलमय वातावरणात रॅली काढून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




# पिटसई येथील शाळेच्या मुख्याध्यापकपदी अरुण खुळपे



**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यामंदिर येथील अरुण शिवाजी खुळपे यांनी नुकताच मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. या शाळेचे चेअरमन खेळू वाजे व सचिव संजय रेडीज यांनी त्यांना आदराने हा पदभार दिला.

अरुण खुळपे यांनी सहाय्यक शिक्षक पदावर गेली ३२ वर्ष या विद्यालयात काम केले आहे. सामाजिक उपक्रम तसेच कला व क्रीडा क्षेत्रात मुले अग्रेसर होण्यासाठी शाळेतर्फे त्यांनी विविध उपक्रम राबवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गणित विषयांमध्ये मोठा हातखंडा आहे. इयत्ता दहावीचा शंभर टक्के निकाल त्यांच्या कारकिर्दीत बऱ्याच वेळा लागला आहे.

अरुण खुळपे हे मूळचे सांगोला (जि. सोलापूर) तालुक्यातील घेरडी या गावचे रहिवासी असून त्यांनी आपला सर्व सेवाकाळ पिटसई येथील लोखंडे विद्यालयात व्यथित केला आहे. शांत स्वभाव व सर्वांशी मिळून मिसळून वागण्याने त्यांनी आपली एक वेगळी छबी निर्माण केली आहे. मुख्याध्यापकपदाचा पदभार स्वीकारतेवेळी संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संतोष रेडीज, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवन्हावे येथे रंगला खेळ महिलांचा उत्सव आनंदाचा!

- अभिनेत्री साक्षी गांधी ठरल्या कार्यक्रमाचे खास आकर्षण
- विजेत्यांना बक्षिसे आणि सहभागी सर्वांना भेटवस्तूने सन्मान

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

संगीत खुर्ची, ग्रुप डान्स, प्रश्न मंजूषा अशा फनी गेम्सची रेलचेल असलेला खेळ महिलांचा उत्सव आनंदाचा या महिला दिनानिमित्त कार्यक्रमाला देवन्हावे (ता. खालापूर) येथे महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अभिनेत्री साक्षी गांधी या कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरल्या.



जागतिक महिला दिनानिमित्त देवन्हावे (ता. खालापूर) येथील विनायकराव चौधरी रंगमंचसमोरील मैदानात खेळ महिलांचा उत्सव आनंदाचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन झी मराठी दुरचित्रवाणी वाहिनी यांच्या वतीने आणि खालापूर पंचायत समितीच्या माजी सभापती श्रद्धा साखरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

सहकुटुंब सहपरिवार या मालिकेतील अवनीची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री साक्षी गांधी यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत वाढली. या कार्यक्रमात झी मराठी वाहिनीच्यावतीने महिलांसाठी फनी गेम्स स्पर्धादेखील घेण्यात आल्या. फनी गेम्स स्पर्धेतील महिलांनी आकर्षक बक्षिसांची रेलचेल होती. विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला तसेच कार्यक्रमात सहभागी सर्व महिलांना श्रद्धा साखरे यांच्या हस्ते आकर्षक भेटवस्तू या वेळी देण्यात आल्या. देवन्हावे ग्रुप ग्रामपंचायत परिसरातील महिलांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाला देवन्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, युवा नेते अंकित साखरे, सरपंच रत्ना वाघमारे, नितीन चौधरी, संजय कडव, अविनाश पाटील, भगवान पाटील आदी उपस्थित होते.


**Public Notice**

Notice is hereby given that our clients, MR. JAGADISH SAMBHAJI PARAB and MRS. SONALI JAGADISH PARAB, are the current co-owner and occupier of Flat No A-102, Relax Residency, House No-1181 B & C, Sector-35 D. Owe - Khutukbandhan, Kharghar 410210 and have purchased the flat from M/s. Relax Developers as per the Agreement for Sale dated 17/03/2017.

MR. SAMBHAJI RAMCHANDRA PARAB was the co-owner of the above said flat and member of Relax Residency Chs and he expired on 25/02/2024 at SSPM Medical College and Lifetime Hospital, Padave.

If anyone has any claim, such as through a mortgage, lien, court matters, legal heirs, or any other rights, please visit our office in person between 11 am to 5 pm. Submit the supporting documents for your claims to the authorized signatory below. This must be completed within 15 days of this paper public notice. After this, no further objections or claims will be considered.

dated : 21/03/2025

sd/-
**ADITYA KATAKDOUND**
Kharghar Cha Raja Ganesh Temple (Basement), Sector 12, Kharghar, Navi Mumbai 410 210, mob :- 9594962207

# आयपीएलमध्ये आणखी एका नियमात बदल

## दुसऱ्या डावात ११व्या षटकापासून नवीन चेंडू वापरता येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएलला शनिवार (दि. २२)पासून सुरुवात होणार आहे. त्याआधी यंदाच्या हंगामात होणाऱ्या बदलांबाबत बीसीसीआयच्या वतीने घेण्यात आलेल्या बैठकीत काही नियमांबाबत निर्णय घेण्यात आले. यामध्ये दुसऱ्या डावात ११व्या पटकापासून दुसरा नवीन चेंडू घेता येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

बीसीसीआयच्या नियमानुसार दुसऱ्या डावात नवा चेंडू वापरता येईल. धावांचा पाठलाग करणाऱ्या संघांना फलंदाजीदरम्यान दवबिंदूचा अनावश्यक लाभ होऊ नये यासाठी हा नियम लागू करण्यात आला आहे. यामुळे ११च्या षटकात नवा चेंडू गोलंदाजांना



व्यवस्थित पकडणे सोपे होईल आणि दवबिंदूपासून मुक्ती मिळेल.

क्रिकबझच्या मते, आयपीएल २०२५च्या कर्णधारांच्या बैठकीत नवीन नियमांवर चर्चा झाली. सर्व कर्णधारांना दुसऱ्या चेंडू नियमांबद्दल माहिती देण्यात आली. तथापि, हा अनिवार्य नियम असणार नाही. उलट दुसरा चेंडू घेण्याची परवानगी द्यायची का हे पंच ठरवू शकतील. चेंडू बदलायचा की नाही हे पंचांनी ठरवावे. ते दवबिंदूच्या स्थितीच्या आधारावर निर्णय घेतील, असे सूत्राने सांगितले.

दरम्यान, याआधी बीसीसीआयने आयपीएल कर्णधारांच्या सहमतीने आगामी सत्रात चेंडूवर लाळ लावण्यावरील बंदी उठविण्याचा निर्णय घेतला. कोरोना काळानंतर लाळेचा वापर पुन्हा सुरू करणारी आयपीएल ही सर्वात पहिली मोठी स्पर्धा ठरली आहे. काही कर्णधारांना लाळेचा वापर पुन्हा सुरु करण्याबाबत साशंकता होती. काही कर्णधार तटस्थ राहिले, पण सर्वाधिक कर्णधारांनी या निर्णयाला पाठिंबा दर्शविला.

याचबरोबर बीसीसीआयने उंचावरून जाणारा वाइड चेंडू आणि ऑफ स्टम्पबाहेरच्या वाइड चेंडूसाठी डीआरएसच्या वापरास मंजुरी दिली आहे. हा निर्णय घेण्यासाठी हॉक आय आणि बॉल ट्रॅकिंगचा वापर करण्यात येणार आहे.

### संध्याकाळच्या मॅचमध्ये पंच घेणार निर्णय!

चेंडू बदलायचा की नाही, नवा चेंडू द्यायचा की नाही हे पंच ठरवतील. चेंडू बदलण्याचा निर्णय दवबिंदूच्या स्थितीवर आधारित असेल. दुपारच्या सामन्यामध्ये हा नियम लागू होण्याची शक्यता नाही. केवळ सायंकाळच्या सामन्यासाठी हा नियम अमलात आणला जाईल.

# चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या भारतीय संघाला बीसीसीआयकडून बक्षीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने अंतिम सामन्यात न्यूझीलंड संघाचा पराभव चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या करंडकावर आपले नाव कोरले. हा ऐतिहासिक विजय साजरा करण्यासाठी बीसीसीआयने संपूर्ण संघावर पैशांचा वर्षाव केला आहे. बीसीसीआयने गुरुवारी विजेत्या भारतीय संघासाठी बक्षिसाची रक्कम जाहीर केली.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉपीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राहत जेतेपदावर कब्जा केला. विराट कोहली, श्रेयस अय्यर, कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती हे भारतासाठी सर्वात मोठे हिरो ठरले आणि या खेळाडूंनी विजेतेपद मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, तर कर्णधार रोहितची अंतिम सामन्यातील खेळी मॅचविनिंग ठरली.

बीसीसीआयने खेळाडू आणि कोचिंग स्टाफसह स्पर्धेशी संबंधित सर्व संघ सदस्यांना ५८ कोटी रुपयांची बक्षीसाची रक्कम जाहीर केली आहे.

बीसीसीआयने बक्षीस जाहीर करण्यासाठी एक निवेदन जारी केले. या निवेदनात म्हटले आहे



की, आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मधील विजयानंतर टीम इंडियासाठी ५८ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करताना बीसीसीआयला आनंद होत आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ आणि निवड समितीच्या सदस्यांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे.

गेल्या वर्षी भारतीय संघाने १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्या वेळीही बीसीसीआयने टीम इंडियाच्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी आपली तिजोरी उघडली होती. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघासाठी बोर्डाने १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ही बक्षिसाची रक्कम सर्व खेळाडू, निवडकर्ते, प्रशिक्षक आणि सपोर्टिंग स्टाफमध्ये वाटण्यात आली.

# अलिबागच्या शुभम नखातेला सिकाई मार्शल आर्टमध्ये 'सुवर्ण'





**रेवदंडा : प्रतिनिधी**

राजस्थानमधील जयपूर येथे नुकतीच २५वी सिनियर सिकाई मार्शल आर्ट राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा झाली. या स्पर्धेत अलिबागमधील शुभम महेंद्र नखाते यांने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत सुवर्णपदक पटकाविले.

स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात लोबा फाईट प्रकारात शुभमने 'सुवर्ण' कामगिरी केली. त्याचबरोबर रायगडच्याच आकांक्षा विजय तांबडकर हिने रौप्यपदक जिंकले. या दोन्ही खेळाडूंचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

शुभम आणि आकांक्षा यांना सिकाई मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्र अध्यक्ष मास्तर मजर खान व सचिव मास्टर रवींद्र गायकी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रशिक्षक मास्टर विजय तांबडकर व प्रियंका गुंजाळ यांचे प्रशिक्षण लाभले.



# जान्हवी बहाडकरचे पंतप्रधान मोदींकडून कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यू म्हाडा कॉलनी दिंडोशी, इमारत क्रमांक ३मध्ये राहणाऱ्या जान्हवी बहाडकर हिने इटली येथे झालेल्या विशेष हिवाळी ऑलिम्पिकमध्ये देदीप्यमान कामगिरी केली.

महिला फ्लोअरबॉल खेळात भारतीय संघाने कांस्य पदक पटकावले. यामध्ये जान्हवीने कठोर परिश्रमाने आणि समर्पणाने भारताचे, पर्यायाने आपल्या कॉलनीचे सुद्धा नाव उज्ज्वल केले आहे. तिच्यासह या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंचा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्कार केला.

दरम्यान, ३१ मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थित म्हाडा क्रीडा महोत्सवात जान्हवीचा सन्मान करण्यात येणार आहे.

# 'एमसीए'चा वार्षिक पुरस्कार सोहळा उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई क्रिकेट असोसिएशनचा वार्षिक पुरस्कार सोहळा गुरुवारी बीकेसी येथील एमसीए अकादमीच्या मैदानात पार पडला. या वेळी २०२२-२३ आणि २०२३-२४ अशा दोन सत्रांतील पुरस्कार वितरण करण्यात आले.

सोहळ्यास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, माजी अध्यक्ष आशिष शेलार आणि एमसीएचे इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

'एमसीए'ने अनुभवी क्रिकेट प्रशासक प्रा. रत्नाकर शेट्टी आणि माजी दिग्गज क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांचा २०२२-२३ या सत्रासाठी, तर माजी दिग्गज क्रिकेटपटू डायना एडुल्जी आणि ज्येष्ठ क्रिकेट प्रशासक प्रवीण बर्वे



यांचा २०२३-२४ या सत्रासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला.

वैयक्तिक कारणामुळे मुंबई बाहेर असलेले वेंगसरकर उपस्थित राहू शकले नाहीत. देशांतर्गत स्पर्धामध्ये शानदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंनाही 'एमसीए'ने गौरविले. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वात २०२३-२४च्या सत्रात रणजी करंडक पटकावलेल्या मुंबई संघासह राष्ट्रीय महिला अजिंक्यपद स्पर्धेतील विजेत्या मुंबई संघालाही सन्मानित करण्यात आले.

**यांचा विशेष सन्मान**

दिवंगत फिरकीपटू पद्माकर शिवलकर यांच्या कुटुंबियांचा राज्यपालांच्या हस्ते विशेष सन्मान झाला. काही दिवसांपूर्वीच ३ मार्च रोजी वयाच्या ८४व्या वर्षी अखेरचा श्वास घेतलेल्या शिवलकर यांनी वयाच्या पन्नाशीमध्येही प्रथमश्रेणी क्रिकेट खेळत एकूण १२४ सामन्यांत ५८९ बळी घेतले. त्याचप्रमाणे मुंबईच्या मैदान क्रिकेटमध्ये भरीव योगदान देऊन तळागाळातील गुणवत्ता शोधणारे गोपाळ कोळी आणि मधुकर मोहोळ यांचाही 'एमसीए'ने विशेष सत्कार केला.

# आयपीएलमधील सर्व कर्णधारांचे एकत्र फोटोशूट





**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेच्या १८ व्या हंगामाला २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. या आधी स्पर्धेत सहभागी असलेल्या १० फ्रँचायझी संघांच्या कर्णधारांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या मुख्यालयात बैठक पार पडली. त्यानंतर एकत्रित जमलेल्या सर्व कर्णधारांचे ट्रॉफीसह फोटोशूटही झाले.

या वेळी प्रत्येक कर्णधाराचा रुबाब बघण्याजोगा होता. सोशल मीडियावर सर्व १० फ्रँचायझी संघातील कर्णधारांच्या खास भेटीचे फोटो व्हायरल होताना दिसत आहेत. या फोटोंवर लाईक्स अन् कमेंट्सची बरसात तर पहायला मिळतेच, पण यावरून काही भन्नाट मीम्सही चर्चेत आहेत.

आयपीएलच्या अधिकृत अकाउंटवरून कर्णधारांच्या मेळाव्याचे खास फोटो शेअर करण्यात आले आहेत. सनरायझर्स हैदराबाद, चेन्नई सुपर किंग्ज, राजस्थान रॉयल्स, गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स या संघांनी गत कर्णधारावरच विश्वास कायम ठेवला आहे. गत हंगामात या पाच फ्रँचायझी संघाचे नेतृत्व अनुक्रम, पॅट कमिन्स, ऋतुराज गायकवाड, संजू सॅमसन, शुबमन गिल आणि हार्दिक पांड्या यांनी केले होते. यंदाच्या हंगामातही हेच चेहरे आपापल्या संघाचे नेतृत्व करताना दिसतील.

यंदाच्या आयपीएल हंगामात फक्त एकच परदेशी चेहरा कॅप्टन्सी करताना दिसणार आहे. काव्या मारनच्या सनरायझर्स हैदराबादच्या संघाचे नेतृत्व वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलियन कॅप्टन पॅट कमिन्स याच्याकडे आहे.

**पाच संघांच्या नेतृत्वात बदल**

यंदाच्या हंगामात गत चॅम्पियन्स कोलकाता संघाने अजिंक्य रहाणेकडे नेतृत्व दिले आहे. याशिवाय पंजाब किंग्जच्या संघाने श्रेयस अय्यरला आपला नवा कर्णधार केले आहे. रजत पाटीदार हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचे नेतृत्व करताना दिसणार आहे. याशिवाय ऋषभ पंत लखनऊच्या संघाचा, तर अक्षर पटेल दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व करेल.

# मुंबई इंडियन्सने लाँच केले नवीन अँथम साँग

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघ मुंबई इंडियन्सने त्यांचे बहुप्रतीक्षित अँथम साँग रिलीज केले. या अँथम साँगची मुख्य ओळ आहे 'प्ले लाइक मुंबई' म्हणजेच 'मुंबईसारखा खेळ.'

या गाण्याला खूप खास व्यक्तींने गायले आहे. गाण्यात 'मैं नहीं तो कौन बी'मधून प्रसिद्ध झालेल्या सृष्टी तावडेने आवाज दिला आहे. यात बॉलीवूड अभिनेता जॅकी श्रॉफ मस्त अंदाजात रोहित शर्माची एन्ट्री करताना दिसत आहे.

मुंबई इंडियन्स संघ आयपीएल पहिला सामना २३ मार्च रोजी चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध खेळणार आहे. रविवारी होणारा हा सामना एमए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल.

आयपीएलमध्ये सर्वाधिक जेतेपदे जिंकण्याच्या बाबतीत मुंबई इंडियन्स सीएसकेसोबत पहिल्या क्रमांकावर आहे. या दोन्ही संघानी प्रत्येकी पाच आयपीएल ट्रॉफी जिंकल्या आहेत. रोहितच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने २०१३, २०१५, २०१७, २०१९ आणि २०२०मध्ये आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे.

# युझवेंद्रच्या टी-शर्टवरील मेसेजने वेधले लक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा फिरकीपटू युजवेंद्र चहल आणि मॉडेल-डान्सर धनश्री वर्मा या दोघांच्या घटस्फोटावर अखेर गुरुवारी शिक्कामोर्तब झाले. डिसेंबर २०२०मध्ये लग्न झाल्यानंतर जून २०२२पासून हे दोघे विभक्त राहत होते. गेल्या अडीच वर्षांपासून एकमेकांपासून वेगळे राहिल्यानंतर अखेर ते कायदेशीररित्या लग्नाच्या बंधनातून मुक्त झाले.

मुंबईतील वांद्रे येथील फॅमिली कोर्टात युजवेंद्र-धनश्री यांच्या घटस्फोटावर अंतिम निकाल देण्यात आला. वकिलांनी बाहेर येऊन याबाबत माहिती दिली. या वेळी युजवेंद्र चहलदेखील त्यांच्यासोबत होता. त्याने यावर मौन बाळगले, पण त्याच्या टी शर्टवर असलेल्या स्पेशल मेसेजची चांगलीच चर्चा रंगली.

वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात युजवेंद्र चहल आला तेव्हा त्याने घातलेल्या टी-शर्टने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. युजवेंद्र चहलने काळ्या रंगाचा टी-शर्ट घातला होता. त्या टी-शर्टवर लिहिले होते, 'बी यूर ओन शुगर डॅडी' नेटकऱ्यांच्या मते, हा स्पेशल मेसेज धनश्री वर्मासाठी असावा. चहलने घटस्फोटानंतर धनश्रीला एकूण





४.७५ कोटी रूपये देण्याचे कबूल केले आहे. हे दोघे गेली अडीच वर्षे एकमेकांपासून विभक्त राहत होते. त्यामुळे या मेसेजमागे आर्थिक अँगल असल्याचे बोलले जात आहे.

आपल्या जर काही अवास्तव गरजा असतील, तर त्या पूर्ण करण्यासाठी तुम्ही स्वत: तितके पैसे कमवा आणि स्वत:साठी खर्च करा. दुसऱ्यांना त्याचा त्रास किंवा भार देऊ नका, असा या मेसेजचा अर्थ असल्याची चर्चा सुरू आहे.

# आयपीएल अंपायरिंगमध्ये सात नवे चेहरे

## ■ ज्येष्ठ पंच अनिल चौधरी आता करणार समालोचन

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठ्या आणि लोकप्रिय टी-२० लीग अर्थात आयपीएलमध्ये सात नवे चेहरे पंच म्हणून दिसणार आहेत. याशिवाय आतापर्यंत आयपीएलच्या १७ हंगामात पंचाच्या भूमिकेत दिसलेले अनिल चौधरी या वेळी नव्या भूमिकेत दिसतील.

आयपीएल स्पर्धेसाठीच्या अंपायरिंग पॅनलमधील सात नव्या चेहऱ्यांमध्ये स्वरूपानंद कन्नूर, अभिजीत भट्टाचार्य, पाराशर जोशी, अनीश सहस्त्रबुद्धे, केयूर केलकर, कौशिक गांधी आणि अभिजीत बेंगेरी यांचा समावेश आहे. हे नवे चेहरे अनुभवी पंच एस रवी आणि सीके नंदन यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत अंपायरिंग करताना दिसतील.



या चेहऱ्यांशिवाय माइकल गॉफ, क्रिस गॅफनी आणि अँड्रियान होल्डस्टॉक यांच्या रुपात तीन आंतरराष्ट्रीय स्तरावरील पंच यंदाच्या आयपीएल हंगामात पंचाच्या भूमिकेत दिसतील.

२००८पासून आयपीएल स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेतील पहिल्या हंगामापासून अनिल चौधरी सातत्याने पंचाच्या भूमिकेत दिसले आहेत, पण ६० वर्षीय दिग्गज पंच यंदाच्या हंगामातील अंपायर्स पॅनेलमध्ये दिसणार नाही. यामागचे कारण त्यांनी या वेळी समालोचन करण्याचा निर्णय घेतलाय.

चौधरी यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय अंपायरिंगच्या कारकिर्दीत १२ कसोटी, ४९ वनडे आणि ६४ टी-२० सामन्यात पंच म्हणून कामगिरी पाहिली आहे. २०२४च्या हंगामातील रणजी ट्रॉफी स्पर्धेच्या फायनलनंतर ते शेवटचे पंच म्हणून दिसले होते. आता ते कॉमेंट्री बॉक्समध्ये आपल्या नव्या इनिंगची सुरुवात करतील.

दरम्यान, श्रीलंकेचे कुमार धर्मसेना हे प्रसिद्ध पंच आहेत, पण या वेळी आयपीएलमध्ये ते दिसणार नाहीत. यामागचे नेमके कारण काय ते गुलदस्त्यातच आहे.

# दुखापतीमुळे मोहसिन खान संघाबाहेर?

## एलएसजीकडून शार्दूल ठाकूरला मिळणार संधी

**लखनऊ : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगचा १८वा हंगाम २२ मार्चपासून सुरू होणार आहे. स्पर्धेपूर्वीच लखनौ सुपर जायंट्स संघाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज मोहसीन खान गंभीर दुखापतीमुळे संपूर्ण हंगामाला मुकण्याची शक्यता आहे.



मोहसीन खान घोटच्याच्या दुखापतीमुळे गेल्या तीन महिन्यांपासून क्रिकेटपासून दूर आहे. नुकताच तो संघाच्या ट्रेनिंग कॅम्पमध्ये सहभागी झाला होता, पण नेट्समध्ये गोलंदाजी करताना त्याला दुखापत झाली. त्यामुळे तो या हंगामात खेळू शकेल की नाही याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

लखनऊ सुपर जायंट्सने आधीच मोहसीन खानच्या जागी नव्या खेळाडूचा संघात समावेश केला आहे. रिपोर्ट्सनुसार मुंबईचा अष्टपैलू खेळाडू शार्दूल ठाकूर आता लखनऊ संघात खेळताना दिसणार आहे. तो संघासोबत आधीच जोडला गेला असून २४ मार्च रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पहिल्या सामन्यासाठी विशाखापट्टणमला संघासोबत जाणार आहे.

शार्दूल यंदाच्या आयपीएल मेगा ऑक्शनमध्ये दोन कोटी रुपयांच्या बेस प्राइससह उतरला होता, मात्र त्याच्यावर कोणत्याही संघाने बोली लावली नव्हती. आता लखनऊ सुपर जायंट्सने त्याला त्याच बेस प्राइसवर करारबद्ध केले आहे. आयपीएलमध्ये ही त्याची सहावी टीम असेल.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com